Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

* वर्ष ६ * अंक ११५ * * नाशिक * रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## ईडी जप्त करणार ६६१ कोटींची मालमत्ता

नॅशनल हेराल्ड प्रकरण

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** कॉंग्रेसच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणाच्या चौकशीदरम्यानची मालमत्ता जप्त केली जाईल. ईडीने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे की, त्यांनी ६६१ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी नोटीस बजावली आहे.
पीएमएलए कायद्याच्या कलम ८ आणि असोसिएटेड रूल्सच्या नियम ५(१) नुसार, ईडीने या मालमत्ता असलेल्या मालमत्तांच्या संबंधित रजिस्ट्रारकडे कागदपत्रे सोपवली आहेत. ईडीने ताब्यात घ्यायची जागा रिकामी करण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### २ नक्षलवादी ठार

■ **दंतेवाडा :** छत्तीसगडमधील दंतेवाडा-विजापूर सीमेवरील भैरमगड परिसरात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. सकाळी ९ वाजल्यापासून दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू होता. ज्यामध्ये सैनिकांनी २ माओवाद्यांना ठार मारले आहे. दोघांचेही मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.
दंतेवाडा जिल्ह्याचे एसपी गौरव राय म्हणाले की, विजापूरच्या इंद्रावती भागातील जंगलात माओवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती, त्यानंतर सुमारे ४०० सैनिकांना कारवाईसाठी पाठवण्यात आले. २०२५ मध्ये आतापर्यंत सैनिकांनी १४६ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे.

### २२ राज्यांमध्ये वादळाचा इशारा

■ **नवी दिल्ली :** मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह देशातील २२ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा आहे. ईशान्येकडील आसाम, मेघालय, अरुणाचल आणि इतर राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

राजस्थानपासून आंध्र किनार पट्टीपर्यंत वातावरणाच्या खालच्या थरात द्रोणीय रेषा पसरली असून, ही रेषा विदर्भावरून जात आहे. यामुळे उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र वगळता राज्यात मेघगर्जनेसह पावसाचा यलो अलर्ट मुंबई हवामान विभागाने दिला आहे. १३ एप्रिल रोजी धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, तर १४ एप्रिल रोजी राज्यातील दक्षिणेकडील सर्व जिल्ह्यात आणि १५ एप्रिल रोजी वर्धा आणि यवतमाळ मध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवलेली आहे.

१५ एप्रिलपर्यंत मध्य प्रदेशात तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेचा कोणताही इशारा नाही. ३ जिल्ह्यांमध्ये गारपीट होऊ शकते. यासोबतच हलका पाऊस देखील पडू शकतो.

## स्वत:ला आलमगीर म्हणणाऱ्याची
# कबर महाराष्ट्रातच

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :** स्वतःला 'आलमगीर' समजणारा औरंगजेब ज्याने हिंदवी स्वराज्याचा कट रचला, त्याची कबर महाराष्ट्रातच आहे. पण ही शिवभूमी आहे, इथे औरंगजेबाचे विचार चालणार नाहीत,ह्अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी औरंगजेब समर्थक प्रवृत्तींवर सडकून टीका केली.



शहा यांनी रायगडावर झालेल्या कार्यक्रमात भाषण करताना स्पष्ट इशारा दिला की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. अमित शहा यांनी आज रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करताना राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण वक्तव्ये केली. त्यांनी महापुरुषांच्या अवमानाला रोखण्यासाठी कठोर कायदा आणण्याची घोषणा केली, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव करत रायगडच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला.

शहा यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला सलाम करत त्यांचा आदर्श संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. रायगड हा मराठा साम्राज्याच्या समृद्ध इतिहासाचा साक्षीदार आहे. शिवाजी महाराजांचे शौर्य, नावीन्य आणि स्वराज्याची संकल्पना ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून, ती राष्ट्रीय पातळीवर प्रेरणा देणारी आहे, शिवाजी महाराजांचा वारसा जपण्यासाठी रायगडला प्रेरणास्थळ बनवू, रायगड किल्ल्याच्या संवर्धन आणि विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे शहा यांनी स्पष्ट केले.

## स्फोटानंतर लागलेल्या आगीत
# ५ कामगारांचा मृत्यू



### उमरेड एमआयडीसीमधील घटना : १५ ते २० जखमी

■ **महासागर प्रतिनिधी उमरेड / नागपूर, दि. १२ :** नागपूर जिल्ह्यातील उमरेड एमआयडीसी मध्ये अॅल्युमिनियम फॉइल बनवणाऱ्या कंपनीत शुक्रवारी रात्री लागलेल्या आगीनंतर झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत १५ ते २० कामगार जखमी झाले असून, त्यांच्यावर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासह खाजगी रूग्णालयात उपचार सुरु आहेत.

उमरेड येथील अॅल्युमिनियम फॉइल बनवणाऱ्या कारखान्यात शुक्रवारच्या रात्री आग लागली. त्यानंतर येथे अनेक स्फोट झाले. यावेळी ७० ते ८० कामगार कामावर होते. मात्र, अनेकजण बाहेर पडले. रात्री उशिरापर्यंत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, गॅस उपलब्ध न झाल्याने आग विझवता आली नाही. दरम्यान, या घटनेत अनेक कामगार गंभीर जखमी झालेत. त्यातील, तिघांचा आज रूग्णालयात मृत्यू झाला. घटनास्थळी जेसीबीने उपसा केला असता आज दोघांचे कोळसा झालेले मृतदेह आढळून आले. मृतकांपैकी तिघांची ओळख पटली असून, डीएनए चाचणीद्वारे दोघांची ओळख पटवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, आग आणि स्फोटाची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. ईटनकर, इतर प्रशासकीय व पोलीस अधिकारी तसेच खासदार श्याम बर्वे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी रात्री उशीरापर्यंत घटनास्थळी उपस्थित होते.

दरम्यान, या घटनेतील मृतकांच्या कुटुंबियांना ६० लाख जर जखमींना प्रत्येकी ३० लाख रूपयांची आर्थिक मदत कंपनीकडून देण्यात येणार आहे. पोलिस घटनास्थळी उपस्थित असून उमरेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनाजी जलक अधिक तपास करत आहेत.

## ढिगाऱ्याखाली दबून ५ ठार

विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर उलटला
**२ गंभीर**

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. १२ :** विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर कोसळून झालेल्या अपघातात ५ जण ठार, तर २ जण गंभीर जखमी झालेत. अकोला - मंगरुळपीर रोडवरील दगडपारवा गावाजवळ ही दुर्घटना घडली. मृतांत दुकाचीवरील एका व्यक्तीसह ट्रकमधील ४ जणांचा समावेश आहे.

विटांनी भरलेला ट्रक रस्त्याने जाणाऱ्या दुचाकीवर उलटला. या ट्रकवर ६ मजूर बसले होते. त्यांच्यासह दुचाकीस्वार या विटांच्या ढिगाऱ्याखाली दबला गेला. दबलेल्या लोकांना बाहेर काढेपर्यंत दुचाकीस्वारासह ट्रकमधील ४ जणांचा दबून मृत्यू झाला होता. जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांची खैर नाही



फडणवीस यांनी दिले कायदा करण्याचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना कठोर शासन करण्याप्रकरणी एक कायदा करण्याचे संकेत दिले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना खरेतर टकमक टोकावरून लोटले पाहिजे. पण आपल्याकडे लोकशाही आहे. त्यामुळे या प्रकरणी निश्चित असे काही नियम तयार केले जातील, असे ते म्हणाले.

## सुप्रीम कोर्टाने ठरवली राष्ट्रपतींसाठीही डेडलाइन

राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर २ महिन्यांत निर्णय घ्यावा लागेल

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** आपल्या एका आगळ्यावेगळ्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या राष्ट्रपतींसाठीही कालमर्यादा निश्चित केली आहे. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींना ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकार आणि राज्यपालांच्या प्रकरणात एक ऐतिहासिक निर्णय दिला होता. विधानसभेने पाठवलेल्या विधेयकावर राज्यपालांना एका महिन्याच्या आत निर्णय घ्यावा लागेल, असे न्यायालयाने म्हटले होते. या निर्णयादरम्यान न्यायालयाने राज्यपालांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या विधेयकावरील भूमिकादेखील स्पष्ट केली. हा आदेश ११ एप्रिल रोजी सार्वजनिक करण्यात आला. शुक्रवारी रात्री वेबसाइटवर अपलोड केलेल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या कलम २०१ चा हवाला दिला.

## समृद्धी महामार्गावर बाप-लेक ठार

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :** समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात देवदर्शन करून घरी परतणाऱ्या बापलेकाचा जागीच मृत्यू झाला.



रतन चंदनशिव आणि गोपाल रतन चंदनशिव अशी मृतांची नावे आहेत. रतन यांची पत्नी अर्चना चंदनशिव, मुलगी पूजा चंदनशिव, सून राणी गोपाल चंदनशिव आणि चालक शिवाजी इडोळे हे या अपघातात गंभीर जखमी झालेत. वाशीमचे चंदनशिव कुटुंब देवदर्शनासाठी बुलढाण्याला गेले होते. मेहकर तालुक्यातून जात असताना समृद्धी महामार्गावर त्यांच्या कारला भीषण अपघात झाला.

## फायलींसंदर्भात शहांशी चर्चा नाहीच..

■ **मुंबई, दि. १२ :** एकनाथ शिंदे यांनी काल रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेत अर्थ खात्याबाबत नाराजी दर्शवल्याची माहिती होती. आमच्या फाईल्स अर्थखात्याकडून क्लिअर होत नाहीत, अशी तक्रार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहांकडे केली होती. परंतु, याबाबत अमित शहा मला काहीही बोलले नाहीत, शिंदे आणि माझे संबंध चांगले आहेत, असे पवार म्हणाले.



## लखनौची गुजरातवर ६ गडी राखून मात

■ **लखनौ, दि. १२ :** लखनौ सुपरजायंट्सने गुजरात टायटन्सचा ६ विकेट्सने पराभव केला. एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरातने ६ विकेट गमावून १८० धावा केल्या. लखनौने २० व्या षटकात केवळ ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. निकोलस पूरनने ६१ आणि एडेन मार्करमने ५८ धावा केल्या. शार्दुल आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.



## अॅड. निलेश ओझा यांची पार्श्वभूमी गुन्हेगारीचीच
# उच्च न्यायालय कारवाईचे निर्देश देणार का?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** बहुचर्चित दिशा सालियान प्रकरणात वडील सतीश सालियान यांचो वकील अॅड. निलेश चंद्रभूषण ओझा याची पूर्वीपासूनची गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेऊन उच्च न्यायालय कारवाईचे निर्देश देणार का? असा सवाल अॅड. चंद्रशेखर शिंदे (पुसद, जि.यवतमाळ) यांनी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.



अॅड. चंद्रशेखर शिंदे यांचा पत्रकार परिषदेत सवाल

दिशा सालियानचा मृत्यू पाच वर्षांपूर्वी झाला. प्रकरण लोकांच्या विस्मरणात जाऊ लागले. त्यानंतर राष्ट्रीय मानवधिकार सुरक्षा परिषदेचे रशीदखान रहीमखान पठाण याने ठाकरे परिवारा विरूद्ध केलेल्या गंभीर आरोपामुळे दिशा मृत्यु प्रकरणाला गंभीर राजकीय वळण लागले. रशीदखान पठाणच्या तक्रारीवरून मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका आणि रिटपिटीशन दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयात ते प्रकरण सुरु आहे.

उच्च न्यायालयातील प्रत्येक तारखेनंतर दिशा सालियानचे वडील यांचा वकील अॅड. निलेश ओझा हे कामकाजाबद्दल नानाविध वक्तव्ये करीत आहे. काही वक्तव्य वादग्रस्त आणि राजकीय घराण्यासंबंधी तसेच न्यायाधिशांविषयी असल्याने प्रकरण अधीकच चर्चेत आले. न्यायाधिशांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची दखल घेवून उच्च न्यायालयाने अॅड. निलेश ओझा यांच्याविरुध्द अवमानना प्रकरण सुरु केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधिशांच्या खंडपिठापुढे हे अवमानना प्रकरण चालविण्यात येत आहे. या अवमानना प्रकरणात पुढे २९ एप्रिल २०२५ ही तारीख ठेवण्यात आली. या तारखेस अॅड. निलेश ओझा याला अवमानना प्रकरणात लेखी उत्तर दाखल करावयाचे आहे.

दरम्यान, अॅड. चंद्रशेखर शिंदे यांनी पत्रकार परिषदेत अॅड. निलेश ओझा याचा गुन्हेगारी इतिहास आणि पोलीस प्रशासनाची निष्क्रिय भूमिका याविषयी माहिती दिली. निलेश ओझा यांच्या गुन्हेगारी कृत्याविषयी बारकाऊंसील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा हे प्रामुख्याने २०१७ पासून बघ्याची भूमिका घेत आहे. बारकाऊंसीलच्या सर्व सदस्यांची ही भूमिका वकीली व्यवसायातील गुन्हेगारीला अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणारे आहे, असा स्पष्ट आरोप अॅड. चंद्रशेखर शिंदे यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयाने अॅड. विजय कुरले व अन्य यांच्या विरुध्द स्वतःहून सुरु केलेले फौजदारी अवमानना प्रकरण घडले नसते तसेच दिशा सालियान प्रकरणाबाबत अॅड. निलेश ओझा याने उच्च न्यायालयाचे न्यायाधिशांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे पुन्हा त्याचे विरुध्द अवमानना प्रकरण सुरु करण्याची वेळ आली नसती.

अॅड. निलेश ओझा यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन बडनेरा येथे अप. क्र. 261/2017 अंतर्गत भांदविचे कलम 420, 468 नुसार गुन्हा नोंद आहे. पुसद जिल्हा यवतमाळ न्यायालयातील फौजदारी प्रकरण 585/2013 प्रकरणात सुध्दा गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंद असून त्याच्यासह रशीदखान रहीमखान विरुध्द आरोप पत्र दाखल झाले आहे.

राजकीय पाठबळामुळे अॅड. निलेश ओझा यांच्याविरुध्द कार्रवाई होऊ शकली नाही असा आरोप करीत अॅड. निलेश ओझा याचा गुन्हेगारी इतिहास विचारात घेता त्याचे विरुध्द उच्च न्यायालय कारवाईचे आदेश देईल अशी अपेक्षा अॅड. चंद्रशेखर शिंदे यांनी व्यक्त केली.



## महत्त्वाचे

### 'इरदाडी' : अनुभवाची साठवण- राजेंद्र गांगुर्डे

**नाशिक ।** जीवन जगत असताना आलेल्या घटनांचा मागोवा आणि भेटलेल्या विविध व्यक्तींचे चित्रण करताना आलेल्या अनुभवांची




साठवण म्हणजे 'इरदडी' आहे, असे उदगार ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र गांगुर्डे यांनी काढले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'इरदडी' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक काशीनाथ उघडे होते. गांगुर्डे पुढे म्हणाले की, इरदडी नावाचा झरा ३५ वर्षापूर्वी संपूर्ण गावाची तहान भागवत होता. आज तो झरा नष्ट झाला आहे. त्या झऱ्याचे अस्तित्व पुसून टाकून "गरज सरो नि वैद्य मरो" अशी शोकांतिका मनाला बोचते. गावातील विविध माणसं, त्यांचे व्यक्तिमत्त्वातील वेगळपण यांचे चित्रण या पुस्तकात आहे, असे सांगून पुस्तकातील विविध पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची माहिती त्यांनी दिली. रामदास धात्रक आणि नितीन बागुल यांचा ग्रंथभेट देऊन सन्मान करण्यात आला. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर राजेंद्र उगले यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.१५) सुभाष उमरकर 'अंतर्मनाचे अंतरंग' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### भगवान शिव चैतन्य असून, भक्तीमध्ये जीवनाचा सार- डॉ. गुट्टे महाराज

**नाशिक ।** सर्व सुखाच्या आगर! म्हणे नरहरी सोनार!! भगवान शंकराच्या चरणाशी रत झाल्यानंतर सर्व सुख आपल्याला प्राप्त होतात



असे महान शिवभक्त संत नरहरी सोनार महाराज म्हणतात .भगवान शिव हे चैतन्य असून, आपल्या जीवनाचा सर्वस्व सार त्यांच्या भक्तीमध्ये आहे. भगवान शंकराच्या भक्तीमध्ये सर्व प्रकारचे सुख मिळत असल्याचे विचार संत साहित्याचे अभ्यासक डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार जगन्नाथ अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गोदाघाट येथील श्रीराम सत्कार्य मंडळ ट्रस्ट तर्फे देव मामलेदार यशवंतराव महाराज पटांगण येथे सुरू आलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात ६ व्या दिवसाची कीर्तन सेवा करताना महाराज बोलत होते. भस्म उटी रुंडमाळा! हाती त्रिशूल नेत्रिज्वाळा!! या अभंगावरती डॉ. गुट्टे महाराज यांनी कीर्तनात निरुपण केले. ते म्हणाले की, मानवी जीवनात आल्यानंतर आपण आपल्या सुखाला पारखे होऊ नका. भगवान शंकराची भक्ती केल्यानंतर आपल्याला सर्व प्रकारचे सुख मिळवून, तिन्ही प्रकारचे दोष जाऊन आपल्या जीवनात कल्याण होत असते. भगवान शिव सर्व जगात दुःख सहन करण्यासाठी विष पिऊन त्यांचा कंठ काळा झाला. जो त्रिशूल धारण केलेला केला आहे. रजगुण, सत्वगुण, तमगुण, जागृती, स्वप्न, सुषुप्ती, स्थूल सूक्ष्म आणि कारण शरीर या सर्वांचं सर्व तीन गुण तीन अवस्था व तीन शरीर हे सर्व भगवान शंकराच्या हातात असून, त्यांना शरण गेल्यानंतर निश्चितच आपल्याला आपल्या जीवनामध्ये समाधान मिळतं व एक ऊर्जा प्राप्त होऊन जीवन जगण्याला बळ मिळते, असेही डॉ गुट्टे महाराज यांनी सांगितले. यावेळी नरहरी उगलमुगले, तुकाराम नागपुरे, अनिल परदेशी, मधुकर बुरकुल, सुनीता गंभीरे, सोनाली बडगुजर यांच्यासह वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाशिक एज्युकेशन सोसायटीतर्फे सेवानिवृत्तांचा कृतज्ञता सोहळा

**एकलहरे ।** महाराष्ट्रातील नामांकित नाशिक एज्युकेशन सोसायटीद्वारा संस्थेच्या सर्व शाळांतून सेवानिवृत्त झालेल्या सेवाभावी शालेय पदाधिकारी व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा कृतज्ञता सोहळा १६ एप्रिल रोजी परशुराम सायखेडकर नाट्यगृहात सकाळी १० वाजता संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा. दिलीप फडके तर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध उद्योजक तथा एम्पायर स्पाइसेस ॲंड फुड्स लिमिटेडचे चेअरमन हेमंत राठी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कृतज्ञता सोहळ्याच्या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे,ॲड.जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम, शिक्षक मंडळ अध्यक्ष नंदा पेटकर, शि.मंडळ उपाध्यक्ष राजेंद्र कापसे, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी, उत्सव समिती निमंत्रक प्राजक्ता क्षीरसागर, सर्व कार्यकारी मंडळ, संस्था पदाधिकारी, उत्सव समिती सदस्य यांनी केले आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंना जनतेचे अभिवादन...

**नाशिक ।** क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुंबई नाका येथील फुले स्मारकात माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी फुले दांपत्याच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते पालखीचे व रथाचे पूजन करत मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत व उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात व फटक्यांच्या आतिषबाजीमध्ये जल्लोषपूर्ण वातावरणात भव्य चित्ररथ मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आदिवासी सांस्कृतिक नृत्य हे या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत मुंबई नाका फुले स्मारक येथील पुतळ्यास जयंतीनिमित्त सामाजिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच 20 x 60 च्या भव्य स्क्रीनवर क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंनी केलेल्या संघर्षाची माहिती व त्यांचा जीवनपट बघून उपस्थित सर्वजण स्तब्ध झाले होते. मुंबई नाका येथील फुले स्मारक येथून संध्याकाळी मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. तत्पूर्वी महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला छगन भुजबळ, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार डॉ.शोभा बच्छव, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार सत्यजित तांबे, सीमाताई हिरे, माजी आमदार वसंत गिते, जेष्ठ नेते दिलीप खैरे, नानासाहेब महाले, सुनील बागूल, दत्ता गायकवाड, प्रकाश लोंढे, बाळासाहेब कर्डक, शिवसेना जिल्हाध्यक्ष अजय बोरस्ते, भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, विष्णुपंत म्हैसधुणे, शिवसेना महानगरप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, गणेश गिते, विनायक पांडे, आकाश छाजेड, नाना शिलेदार, नगरसेविक राहुल दिवे, अर्चना थोरात, नयना गांगुर्डे, कविता कर्डक, संजय साबळे, दिनकर पाटील, गजानन शेलार, गोरख बोडके, महेश हिरे, निवृत्ती अरिंगळे, अनिल जाधव, महेश हिरे, मामा राजवाडे, प्रथमेश गिते, बाजीराव तिडके, बाळासाहेब जानमाळी, प्रेरणा बलकवडे, समाधान जेजुरकर, गुन्हे शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, अजित लेनकर, नीलिमा सोनवणे, मनोहर कोरडे, अमर वझरे, प्रा ज्ञानेश्वर दराडे, मिलिंद भालेराव, प्रसाद सोनवणे, अमोल नाईक आदींसह विविध मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीत राममुक्ती मित्र मंडळ, माळी महासंघ, जुने नाशिक मित्र मंडळ, निर्मिक फाउंडेशनचे चित्ररथ होते. मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात विविध मंडळाचा लक्षणीय सहभाग दिसून आला. प्रत्येक मंडळाचा विविध देखाव्याचा साधारणपणे २० चित्ररथ मिरवणुकीत सहभागी झाले होते. उत्सव समितीच्यावतीने या भव्य मिरवणुकीत महात्मा ज्योतीराव व सावित्रीबाई फुले तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या देखाव्याची घोडा बग्गी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. जिवंत देखावा मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. यावेळी मिरवणूक मार्गातील विविध पुतळ्याना अभिवादन करण्यात आले. तसेच पारंपारिक भव्य ढोल पथक, लेझिम पथक, बँड पथकासह महात्मा फुलेंची पालखी काढण्यात आली. महिलानी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा जल्लोष केला. यावेळी मिरवणुकीतील महिला व पुरुषांनी डोक्यावर फेटे परिधान केले होते. यासह वारकरी संप्रदाय, आदिवासी नृत्यपथक, वासुदेव वेशभूषा असे विविध देखावे बघण्यासाठी मोठ्या संख्येने तरुण-तरुणी, समाजबांधव व नाशिककर आपल्या कुटुंबांसह या मिरवणुकीत सहभागी झाले होते. मिरवणूक मुंबई नाका फुले स्मारक, सारडा सर्कल, दूध बाजार, भद्रकाली, मेनरोड, धुमाळ पॉइंट, दहीपूल, संत गाडगे महाराज पुलावरून गणेशवाडी येथील महात्मा फुले पुतळ्याजवळ रात्री पोहचली. यावेळी येथे डोळ्याची पारणे फेडणारी भव्य-दिव्य आतिषबाजी करण्यात आली. महात्मा फुले जयंतीच्या मिरवणुकीत सहभागी मंडळांनी डीजेला फाटा दिल्याचे चित्र पहावयास मिळाले. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरातच मिरवणूक काढण्यात आली होती. यामुळे ध्वनिप्रदूषणाला निश्चितच आळा बसण्यास मदत होत आहे. नाशिककरांनी पाडलेला हा नवीन पायंडा पर्यावरणपूरक असल्याने उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे, कार्यकारी अध्यक्ष शशी हिरवे, महिला अध्यक्ष तेजश्री काठे, कार्याध्यक्ष सचिन काठे, कार्याध्यक्ष संदीप गांगुर्डे, महिला कार्याध्यक्ष आशा भंदुरे यांचे नाशिककरांनी आभार मानले.

यावेळी उपाध्यक्ष सुरेश दलोड, किसन बल्लाळ, शंकर मोकळ, प्रमोद बनकर, संजय अभंग, संदीप बनकर, विशाल जेजुरकर, साहेबराव बनकर अमोल नाईक, गणेश खोडे, विनोद डोके, सचिन जगझाप, राकेश शेवाळे, राहुल घोडे, प्रफुल्ल वाघ, विकास सोनावणे, खजिनदार : संदिप खैरे सह खजिनदार स्वप्निल फुले, समिती समन्वयक शरद मंडलिक, शंतनू शिंदे, अरुण थोरात, मोहन माळी, सरचिटणीस भास्कर जेजुरकर, ज्ञानेश्वर सोमासे, विलास वाघ, महेश ढोले, तुषार विधाते, चैतन्य खैरे, मुक्तेश्वर जाधव, सागर अभंग, विकी गायधनी, प्रसिद्धी प्रमुख : भालचंद्र भुजबळ, संतोष पुंड, शहर संघटक : दिनेश झुटे, किरण गीते, प्रभाकर शेलार, कुलदीप जेजुरकर, अजिंक्य हिंगमिरे, सतिश वाघ, विभाग प्रमुख पंचवटी रामेश्वर साबळे, आडगाव सचिन खोडे, मखमलाबाद, धनंजय थोरात, सातपूर विवेक सोनावणे, आनंदवली नरेश काळे, मध्य नाशिक नाना नाईकवाडे, गंगापूर रोड व्यंकटेश जाधव, सिडको रवींद्र शिंदे, इंदिरानगर संदीप जगझाप आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




पालखी मिरवणुकीचा शुभारंभ. मिरवणुकीत महिला फुगड्या खेळताना आणि पालखीच्या भोई होताना.महात्मा ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांचा घोडाबग्गीतील चलत देखावा. (छायाचित्रे : सोज्ज्वळ साळी)

## जयंतीनिमित्त भव्य चित्ररथ मिरवणूक



महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन करताना छगन भुजबळ आणि मान्यवर.



# चिरंजीवी हनुमानाचा जन्मोत्सव...

लहानपणापासून असंच बोलल्याचं मला आठवतंय! हनुमान जयंती म्हटलं कोणी की माझ्या आजीला राग यायचा. मारुती चिरंजीव आहे! मग जयंती मयंती कशी? तिचा आपला वरवर साधा वाटणारा युक्तीवाद होता. आता नव्यानी हा विषय चर्चेत आलाय, येतोय म्हटल्यावर आपल्या जेष्ठांनाही समज आधीच होती हे बघून त्यांचे वंशज म्हणून खूप समाधान मिळते. आजीचाच नाही, आम्हां समस्त वकीलवाडीकरांचा मारुती अगदी जवळचा... घरचाच. हो! मारुती, हनुमान , हनुमंत वगैरे जडत्व शब्दातही नाही इतका घरचा ! वकीलवाडी ही त्या काळातली नाशिकची शान! प्रशस्त रस्ता, भरपूर मोठमोठे वृक्ष, हिरवा, पांढरा आणि सोनचाफ्यानी, बकुळ फुलांनी, रातराणीनी दरवळलेली वकिलवाडी! वेगवेगळ्या फळाफुलांनी, बहरलेली! इथे मोर होते. काकाकुवांनी बंगल्या बंगल्यात वास्तव्य केलेलं होतं. कमळाचे हौद होते. मुळात एकमेकांना सगळ्यात जवळचे नातेवाईक समजणारी सगळी माणसं होती. पैसा अगदी गौण होता. आमच्या वकीलवाडीतली कुत्रीपण शिस्तीत भुंकतात असं इतर जन असुयेनी म्हणतं. तर अशा वकीलवाडीच्या सुरवातीला किंवा उलट्या दिशेनी बघितलं तर शेवटच्या टोकाला मारुतीचं एक देऊळ होतं. हिंग्यांचं! खरंतर ते आजही आहे; पण रस्ता रुंदिकरणात त्याच मुळ वैभव लयाला गेलंय. त्यावेळी जन्मोत्सवाच्या वेळी मातीच्या रंगांनी रंगणारं देऊळ आता संगमरवरी झालंय. त्यावर कळस वगैरे आलाय; पण माझ्या मनाला ते वैभव वाटतंच नाही. काय करणार!

वैभव म्हटल्यावर काही वेगळ येईल डोळ्यासमोर, असं सोन्या-चांदीच मखर, मढवलेले पत्रे, सागवानी कामाचे दरवाजे वगैरे... तर तसं काहीचं नाही. मुळात मारुतीची मूर्ती ही जेमतेम नुक्त्याचं जन्माला आलेल्या बाळा इतकीचं. हातभर हे प्रमाणही मोठ होईल अशी; पण त्या मूर्तीत तेज मात्र जबरदस्त होतं हे नक्की! एका हातात गदा, एका हातात संजीवनीसाठी उचललेला पर्वत आणि उड्डाणासाठी सज्ज अशी ही हसरी, समाधानी चेहेऱ्याची आश्वस्त मूर्ती आमचं श्रध्दास्थान होती. मूर्ती संगमरवरी, पांढरीशुभ्र ! त्याकाळी देवाला कपडे ही संकल्पनाही बहुदा नसावी. मला मूर्ती अशीचं आठवते.

देऊळ किती छोट! मारुतीचं दर्शन घ्यायचं तर तुम्हांला खालीचं बसाव लागेल. ओणव्यानी सुध्दा दर्शन जरा अवघडचं! आतं मारुतीराया पुढे कुलूप नसलेली दानपेटी होती. तिच्या दोन्ही बाजूला दोन छोट्या टोपल्या ठेवलेल्या असतं. पुढे एक अगदी छोटसं उभे बार असलेलं दार, त्यालाही कुलूप वगैरे काहीचं नाही. हे झालं मुख्य देऊळ. मग त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालता येईल इतपतचाचं काळ्या फत्तराचा बांधीव ओटा. जो देवासमोर मात्र चांगलाच वाढवलेला. ओट्याच्या चारही बाजूंना रस्त्यावर खांब ठोकून त्यावर पत्रा घातलेला. उतरत्या छपरा सारखा! पुढच्या बाजूला त्यावरचं लावलेली एक छानशी फार लहान नाही फार मोठी नाही अशी पितळेची चकचकीत घंटी. बस्स! इतकंच हे आमच्या देवळाचं वैभव. देवळाची पुढची ओटी हे आमचं सर्वस्व!

या ओटीवर काहीही घडे. कोणी दुपारी वामकुक्षी घेई तिथे तर कित्येक मुलं भर दुपारी



त्या पत्र्याच्या सावलीत अभ्यास करत बसत. माझ्या आजीचा मालक असल्यागत रुबाब चालायचा तिथे. आमच्या वाड्यात उन्हाचा अभाव. तिची ती गरज मारुती पूर्ण करी. मारुतीचे नवसही साधेच. देवापुढच्या टोपलीत मुठभर धान्य सात दिवस वाहण्याचा कोणी नवस करत तर कोणी सात दिवस चढते उतरते दिवे लावीन असा नवस करीत. नारळबिरळ असं जन्मोत्सवाला किंवा एखाद्यानी काही जगावेगळं करुन वकिलवाडीच नाव. हो! घराचं, कुटुंबाचं नाही ते ओघानी येतातचं. नांव मोठं होई. मान वाढे तो वकीलवाडीचाचं. अशा वेळी नारळ! एरवी नवस इतकाचं! आणि या सगळ्याला मी वैभव म्हणतेय.

आमच्या दुपारची संध्याकाळ व्हायची इथे खांब खांब खेळतांना. सागरगोटे, लपंडाव रंगायचे ते इथेचं. भांडणंही सोडवायचा तो आमची. "अग शप्पथ तू आऊट आहेस. विचार मारुतीला, असं त्याला आमचा सोबती बिनदिक्कत करायचो. आम्ही . तापकिरेंच्या वाड्यातल्या सोनार आजी वारल्यावर त्यांच्या मागे मुलगा नाना राह्यला. डोक्याला कमी होता. मनात आलं तर हमाली करायची नाही तर देवळातले कणकेचे दिवे खाऊन झोपायचं. हे खेळतांना आमच्याचं लक्षात आलं आणि ते आगीसारखं घरोघरी पोहचलं . झालं! त्या दिवसापासून मारुती पुढे टोपलीत कधी पोळीभाजी , सण आला की जेवणाचं पूर्ण पान नैवेद्य म्हणून ठरवून ठेवलं जाऊ लागलं. कोणतेही उपकार न दाखवता, त्याला न दुखवता सगळ्यांनी मिळून नानाची पालखी उचलून घेतली. सोनार आजींच्या मारुतीवरच्या विश्वासाला तडा नाही गेला . त्यांच लेकरु मारुतीरायाच्या कृपेने एकवेळचं पोटभर जेवायचा. मारुतीने एकदा मात्र तो खरंच सजग आहे आमच्यासाठी हे धडधडीत दाखवून दिलं. शेजारच्या घनकर गल्लीत राहणारे दत्तू शेजवळकाका मारुतीचे निस्सिम भक्त! आधी अंघोळ करुन मारुतीला अभिषेक करायला येत. त्यानंतरचं चहापाणी! उठले की अंधारात आधी दिव्याचं बटणं लावायचं ही रोजची सवय. त्या दिवशी काय झालं ते कळलंच नाही आणि ते त्या लाईटच्या बटणाला चिकटले. खूप आरडाओरडा झाला. कोणीतरी प्रसंगावधानाने लाकडी स्टुल त्यांच्याकडे फेकला. कोणी फ्युज काढला आणि ते सुटले. पाचं एक मिनिटं तरी या सगळ्याला लागले असतील; पण दत्तूकाकांची फक्त बोटं काळीनिळी झाली होती. ते जीवानिशी वाचले ही मारुतीचीचं लिला ! तो मग आम्हांला अधिकचं प्रिय झाला.

या घटने नंतर इच्छापूर्ती झाली की एकवीस प्रदक्षिणा नव्यानं त्याच्या नवसात सहभागी झाल्या; पण म्हणून नवसाला पावणारा अशी ख्याती काही त्याची झाली नाही. तोही त्यामुळे निवांत राह्यला आणि आम्हीही!

आता अनेक जणं परदेशी, परगांवी निघून गेलेत. वकीलवाडी ओळखूच येत नाही. अशी एक गल्ली झाली आहे. आजी नाही आता आणि आम्हीही पसरलेल्या शहराच्या एका टोकाला. त्यामुळे देवळात जाणं होतंच नाही. तरी सुद्धा हनुमान जन्मोत्सवाला सूर्योदयापूर्वीचं सुरु होणारे मंत्र, तिथले शंखध्वनी, घंटानाद, थाळीनाद मनात फेर धरु लागतात. प्रसाद म्हणून मिळणारी पंजेरी आपोआप जिभेवर विरघळु लागते आणि पाय देवळाकडे धावत निघतात.

माझ्यासारखी चारदोन वेडी डोकी न ठरवता तिथे भेटतात. कितीही गुढघे दुखले तरी आम्ही दर्शन खाली बसूनचं घेतो. तिथेच पंजेरी, खोबरं, साखर फुटाणे हावरटपणा करत खातो. आजीचा ओलावा शोधत आत्ता नसलेल्या ओट्याच्या भोवती खांब आठवत मी देवळाभोवती फिरते. त्यालाचं प्रदक्षिणा म्हणते आणि घरी परत येते. नवी उमेद घेऊन. त्याच्या दर्शनानी त्याचं सामर्थ्य जाणवतं आणि आपला मारुती, त्याचं देऊळ वाचवायला समर्थ आहे हे जाणवलं की तो आपलाही रक्षणकर्ता आहेच, हा आशावाद जगण्याला नवं बळ देतो. मारुतीराया असचं तुमचं ही रक्षण करो.

• **स्नेहल सारंग, नाशिक**

# रंगावली कृतीतून करा हनुमानाचा जयघोष...

**नाशिक ।** हनुमान जयंती संपूर्ण महाराष्ट्रभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हनुमान जयंती निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या हनुमान मंदिरात उत्सव साजरा केला जातो.

## निमित्त हनुमान जयंतीचे...

कोणत्याही प्रकारचा उत्सव म्हटला की रांगोळी आलीच. यंदा तुमच्याही घराजवळील मंदिरात हनुमान जयंतीचा उत्सव साजरा केला जात असेल, तर या खास प्रसंगी शोभून दिसेल अशा काही आकर्षक रांगोळी डिझाईन्स माधुरी पैठणकर यांनी साकारल्या आहेत. रांगोळीत हनुमानाची गदा दाखवून त्याभोवती वेगवेगळ्या डिझाईन्सची रांगोळी काढू शकता. रांगोळीत हलकीशी नाजूक डिझाईन्स काढून तुम्ही त्यात जय हनुमान असे लिहून रांगोळी अधिक आकर्षक करु शकता. रांगोळी नसेल तर तुम्ही नागवेलीची पानं आणि गुलाबाच्या पाकळ्या तसेच रंगीबेरंगी फुलांच्या मदतीने देखील अशी सुंदर रांगोळी काढू शकता. मारुती स्तोत्रातील श्लोक रांगोळीत लिहून तुम्ही रांगोळी अधिक सुंदर आणि आकर्षक करु शकता. जर तुमच्याकडे रांगोळी काढायला मोठी जागा असेल तर तुम्ही अशा प्रकारे जय हनुमान लिहून त्याभोवती मोठी संस्कारभारती रांगोळी काढू शकता. रांगोळीत दिव्यांची सजावट करून अशा प्रकारची गोलाकार वेगवेगळ्या डिझाईन्सची रांगोळी काढू शकता. गोलाकार रांगोळीच्या आत केशरी रंग भरून त्यावर जय हनुमान असे लिहून बाजूने गोपदक काढून सुरेख अशी रांगोळी काढू शकतो. गोलाकार रांगोळीच्या आत केशरी रंग भरून त्यावर जय हनुमान असे लिहून बाजूने गोपदक काढून सुरेख अशी रांगोळी काढू शकतो. हनुमानाची गदा, शेपूट, टिळा, भगवा झेंडा अशा वेगवेगळ्या गोष्टी रांगोळीत दाखवून सुबक आणि सुरेख अशी रांगोळी काढू शकतो.













– **माधुरी पैठणकर, रांगोळी आर्टिस्ट**

## महत्त्वाचे

### ललिता जाधव राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**पिंपळनेर ।** जि .प.शाळा हट्टी खुर्द येथील पदोन्नती मुख्याध्यापिका श्रीमती ललिता जाधव (बिरारीस) यांना पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान महासंमेलन २०२५ मध्ये



मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या संस्थेच्या वतीने आदर्श मुख्याध्यापक, विद्यारत्न पुरस्कार" प्रदान करण्यात आला.पुणे शहरात ४ एप्रिल २०२५ रोजी सांस्कृतिक सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. संमेलनाच्या उदघाटनाचे प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त एसीपी श्री. भानुप्रताप बर्गे हे होते. सुप्रसिद्ध इंटरनॅशनल आयकॉन डॉ. जे. सानिपीना, पुणे प्रॅक्टिशनर्स डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. शुभदा जोशी, प्राचार्या, शिक्षणतज्ज्ञ श्रीमती प्रगती साळवेकर, इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स संस्थेचे डॉ. अविनाश सकुंडे,संस्थेचे संस्थापक ॲड.कृष्णाजी जगदाळे आदी मान्यवर या पुरस्कार सोहळा संमेलनाला उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. दिपाली परब यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. जे. सानिपीना यांच्या हस्ते श्रीमती जाधव यांना मानाचा फेटा, मानकरी महावस्त्र, गौरव पदक, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातुन विविध क्षेत्रातून पुरस्कारासाठी निवडलेल्या व्यक्तींना या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचा गुणात्मक संख्यात्मक व सर्वांगीण विकास होण्यासाठी ३६ वर्षापासून अविरत अध्यापन कार्य करीत आहेत . याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवुन गुणवत्ता वाढीसाठीचे प्रयत्न करत आहेत.यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल साक्री तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री आर.आर. पगारे, शि.वि. अधिकारी श्री पद्माकर सांगळे, व्ही.व्ही.पवार श्रीमती सुनीता भामरे,सौ भारती बिरारीस,श्रीमती माया दंडगव्हाणे, दुसाणे केंद्राचे सहायक केंद्रप्रमुख अनिश शहा,तसेच दुसाणे केंद्रातील व पिंपळनेर परिसरातील मुख्याध्यापक,शिक्षक बंधू भगिनी, अनिस पिंपळनेर शाखेतील अनिस साथी आदींनी श्रीमती जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

### ज्येष्ठ पुरोहित-याज्ञिकांचा सत्कार

**नाशिक ।** महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान वेद पाठशाळेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी श्रीराम महायोगाची पूर्णाहूती झाल्यावर समाजातील ज्येष्ठ पुरोहित-याज्ञिकांचा सत्कार



पूजन इस्कॉन मंदिराचे स्वामी श्री नरसिंह कृपादास महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी भाजपाचे सरचिटणीस लक्ष्मण सावजी, अखिल ब्राह्मण मध्यवर्तीचे कार्याध्यक्ष अनिल देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर, केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे डॉ. कुमार भट, श्रीराम गोपाल अय्यर, पुरुषोत्तम जोशी महाराज, अविनाश जोशी गुरुजी आदी उपस्थित होते. यावेळी स्वामी नरसिंह कृपादास महाराज यांनी सांगितले की, भगवदगीतेच्या १८ व्या अध्यायातील ४२ व्या श्लोकात ब्रह्मकर्म कर्तव्यांचे वर्णन केले आहे, ज्यामध्ये शम (नियंत्रण), दम, तप (तपश्चर्या) आणि शौच (शुद्धता) यांचा समावेश आहे. 'शमो दमस्तपह शौचं ...... मनाची शांती आणि संयम. दम इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे. तपस्या शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करण्याची क्षमता, साधना.शौच पवित्रता, हे श्लोक सांगते. त्यात ज्ञान, विज्ञान, श्रद्धा, क्षमा, साधेपणा हेच ब्रह्मकर्म देखील आहेत. त्यानुसार आज ज्यांचा सत्कार होतोय ती सर्व मंडळी जेष्ठ याद्निक असून ब्रह्मस्वरूप आहेत आज मला त्यांचे पूजन करण्याचे भाग्य लाभले

या प्रसंगी अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेवाळे, सुनील चौधरी, दामोदर देवरे, प्रवीण पेरकर, पुरुषोत्तम जोशी महाराज, दत्तात्रय पैठणे, गोविंद पैठणे उपस्थित होते. यावेळी श्रीराम महायागामध्ये प्रधान संकल्प, श्रीगणपती पूजन, मातृका पूजन, वास्तुमंडल पूजन, योगिनी मंडल स्थापन, सर्वतोभद्र मंडल देवता स्थापन, श्री राम परिवार महाअभिषेक पूजा, सहस्त्र पुष्पार्चन, तुलसी अर्चना, क्षेत्रपाल मंडल नवग्रह मंडल, रुद्र वरूण, स्थापन महाहवन, श्रीराम परिवार देवता हवन, श्री सूक्त, होम उत्तरांग हवन, बलिदान पूर्णाहूती व महाआरती करण्यात आली. तसेच महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी सुधाकर गर्गे गुरुजी, विनायक अनंत गायधनी, अशोक पंचभाई, प्रकाश शुक्ल, सुरेश शुक्ल, चंद्रशेखर गायधनी, वसंतराव धारणे, चिंतामण आंबेकर, अविनाश दीक्षित, अनिल काका देव, अनिल पंचाक्षरी, प्रभाकर नाचन, प्रकाश शुक्ल, चंद्रशेखर माधव गायधनी,/अण्णा गायधनी, सोमनाथ बेळे, मधुकर दीक्षित, रत्नाकर काळे, महेश कुलकर्णी, विनायक पारशरे आदींचा सत्कार करण्यात आला.

# 'फेसबुक लाईव्ह'द्वारे ब्लॅकमेल करणाऱ्या 'जितेंद्र भावे' विरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल



**नाशिक ।** फेसबुक लाईव्हद्वारे बदनामी करण्याची धमकी देत तब्बल अडीच लाख रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी कथित निर्भय महाराष्ट्र पक्षाचा ब्लॅकमेलर प्रमुख जितेंद्र भावे याच्यासह त्याच्या कार्यकर्त्यांवर इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फेसबुक लाईव्ह करून शासकीय अधिकाऱ्यांना वेठीस धरणाऱ्या भावेने एकतर्फी आंदोलनाने करीत आणखी किती जणांना ब्लॅकमेल केले आहे. याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. गुन्हा दाखल झाल्याने त्याचे अनेक कारणाने उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.आम आदमी पार्टीतून हकालपट्टी झाल्यावर जितेंद्र भावे यांने सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा दिखावा करत निर्भय महाराष्ट्र पक्षाची स्थापना केली. त्यानंतर सातत्याने शासकीय कार्यालये तसेच फायनान्स कंपन्या,बँका आणि हॉस्पिटल्स मध्ये जाऊन त्याने फेसबुक लाईव्ह द्वारे स्टंटबाजी केली. अधिकाऱ्यांचा एकेरी

## अनेकांना ब्लॅकमेल केल्याच्या तक्रारी

भाषेत उल्लेख करत त्याने एकतर्फी बदामी केली.शासकीय अधिकारी चोर असल्याचे तो वारंवार आपल्या फेसबुक लाईव्ह द्वारे सांगत होता.अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या या वादग्रस्त नेत्याने यावेळी थेट एका खासगी शोरूममध्ये घुसून गोंधळ घातला आणि प्रकरण मिटवण्यासाठी तब्बल अडीच लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार इंदिरानगर मधील अशोक लेलँड महावीर व्हील्स शोरूम मध्ये जितेंद्र भावे, वाहन मालक दिगंबर पाटील ,राजेंद्र गायधनी यांच्यासह त्याचे काही कार्यकर्ते गेले. शोरूममधील कर्मचाऱ्यांशी वाद घालत त्यांनी दुरुस्तीसाठी आलेल्या गाडीचे स्पेअर पार्ट्स काढून घेतले, असा आरोप केला.त्यानंतर प्रकरण मिटविण्यासाठी अडीच लाख रुपये खंडणीची मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास शोरूमला वारंवार येऊन फेसबुक लाईव्ह करून बदनामी करू, अशी उघड धमकी दिली. त्यामुळे संबंधित दुकान व्यवस्थापकाने इंदिरानगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जितेंद्र भावे याने या आधीही अनेक वेळा सरकारी कार्यालयांत गोंधळ घातले आहे, अधिकाऱ्यांना धमकावणे, सोशल मिडियावर तगादा लावणे असे प्रकार घडले आहेत. हे सगळं फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून केलं जातं यातून समाजमाध्यमांचा थेट गैरवापर करत. असे प्रकार राजरोसपणे करणाऱ्या भावे आणि त्याच्या कार्यकर्त्यांविरुद्ध कडक कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. गुन्हा दाखल होताच भावे कार्यकर्त्यांसह फरार झाला आहे. दरम्यान भावेविरुद्ध काही तक्रारी असल्यास संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# मविप्र पत्रिकेच्या स्त्री-शक्ती विशेषांकाचे प्रकाशन

## महाराष्ट्रातील ३३ रणरागिणींच्या कार्याला उजाळा



**नाशिक ।** देशभरात विविध क्षेत्रांत कार्यरत आणि आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महाराष्ट्रातील ३३ रणरागिणींच्या संघर्षाच्या व १९ स्त्री जाणिवांचा जागर करणाऱ्या लेखिकांच्या लेखांनी परिपूर्ण अशा 'मविप्र पत्रिका स्त्री-शक्ती विशेषांका'चे गुरुवारी (दि. १०) सायंकाळी प्रकाशन झाले.

आयएमआरटी सभागृहात धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्राच्या अधीक्षक शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांच्या हस्ते व मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. व्यासपीठावर मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, विजय पगार, महिला सदस्य शोभा बोरस्ते उपस्थित होते. या विशेषांकासाठी अतिथी संपादक म्हणून खासदार सुप्रिया सुळे, मुख्य संपादक म्हणून ॲड. नितीन ठाकरे, कार्यकारी संपादक म्हणून प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी तर संपादन सहाय्य म्हणून नितीन कवसकर आणि रवींद्र आखाडे यांनी काम पाहिले.

अंकाची मांडणी व सजावट प्रसिद्ध टायपोआर्टिस्ट सुनील धोपावकर यांनी तर मुखपृष्ठ अमर काळे यांनी केले आहे. लेखकांच्या वतीने डॉ. अश्विनी बोरस्ते यांनी मनोगत व्यक्त करून मविप्रच्या उपक्रमाचे कौतुक केले. प्रा. श्वेताली सोनवणे यांनी प्रमुख मान्यवरांचा परिचय करून देण्यात आला. विशेषांकाचे कार्यकारी संपादक प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी प्रास्ताविक केले. कु. अक्षदा देशपांडे हिने सूत्रसंचालन केले. कु. श्रुती पाटील हिने आभार मानले. कार्यक्रमास मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. डी. डी. लोखंडे, डॉ. नितीन जाधव, प्रा. डी. डी. जाधव, डॉ. विलास देशमुख, डॉ. कैलास शिंदे, डॉ. अजित मोरे, प्रा. शशिकांत मोगल, आयएमआरटीचे संचालक डॉ. प्रशांत सूर्यवंशी, महिला लेखिका व त्यांचे कुटुंबीय, मविप्रच्या विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुलींसाठी आदर्श ठरणार : ॲड. नितीन ठाकरे

शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीवेतून मविप्र संस्था नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. त्याचाच हा एक भाग म्हणून वेगवेगळ्या विषयांना अनुसरून 'मविप्र पत्रिका' हा विशेषांक सुरु करण्यात आलेला आहे. आजवर शिक्षण, आरोग्य, कृषी या विषयावरील तीन विशेषांक प्रकाशित झाले असून, महिला या विषयावरील 'स्त्री-शक्ती' हा चौथा विशेषांक आहे. विशेषतः नवीन पिढीतील मुलींसाठी हा अंक एक आदर्श ठरणार आहे, असा विश्वास मविप्रचे सरचिटणीस ॲड. ठाकरे यांनी व्यक्त केला.

### भावी पिढीसाठी प्रेरणादायी :शर्मिष्ठा घारगे-वालावलकर

महिलांच्या दृष्टीकोनातून मविप्रची ही अभिनव कल्पना आहे. अत्यंत देखना आणि वाचनीय अंक असून, प्रत्येक विद्यार्थिनीने यातील लेख आवर्जून वाचावेत. अगदी सामान्य ते असामान्य अशा सर्वच क्षेत्रातील महिलांचा संघर्षमय प्रवास भावी पिढीसाठी खरोखर प्रेरणादायी ठरणार आहे, असे मत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्राच्या अधीक्षक शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांनी व्यक्त केले.

### ध्येयापर्यंत नेण्यास सहाय्यभूत ठरणार : खा. डॉ. शोभा बच्छाव

सध्याच्या काळात शिक्षण हे खूप महत्वाचे आहे. विद्यार्थिनींनी आपले ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून पावले टाकावीत. या विशेषांकातील महिलांचा संघर्ष तुम्हाला तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचविण्यासाठी सहाय्यभूत ठरणार असल्यचे सांगत खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी 'म' म्हणजे महान, 'हि' हिम्मतवान आणि 'ला' म्हणजे लाखात एक अशा पद्धतीने 'महिला' या शब्दाचा अर्थ उलगडून सांगितला.

# राष्ट्रीय कांदा-लसूण संशोधन केंद्रास कृषिमंत्री यांनी दिली सदिच्छा भेट

## राजगुरूनगरला कोकाटे यांनी घेतली आढावा बैठक



(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** कांदा-लसूण संशोधन केंद्र राजगुरूनगर येथील संस्थेस गुरूवारी (दि.१०) कृषिमंत्री महोदयांनी कांदा-लसूण संशोधन संचालनालयाला सदिच्छा भेट दिली तसेच कांदा लागवड आणि साठवणूक तंत्रज्ञान विषयांवरती सविस्तर चर्चा केली. कांदा साठवणुकीचे आधुनिक तंत्रज्ञान शेतकरी बांधवांपर्यंत कसे पोहोचवता येईल, यासंबंधी मार्गदर्शन केले.

कांदा लसून संशोधन केंद्र राजगुरू नगर संशोधन केंद्राचे संचालक डॉक्टर विजय महाजन यांनी संचालनालयामध्ये सुरू असलेल्या विविध संशोधनावर तसेच विकसित केलेल्या कांद्याच्या विविध जातींबद्दल आणि आधुनिक कांदा साठवणूक तंत्रज्त्रानाबद्दल सविस्तर माहिती कृषीमंत्री यांना दिली. कांदा लसून संशोधन केंद्र राजगुरू नगर संशोधन केंद्रमार्फत शेतकरी गट तसेच फार्मर प्रोड्युसर कंपनी (FPC) यांच्या माध्यमातून कांद्याच्या विविध जातींची विक्री- प्रक्रिया पद्धती बद्दल विस्तृत चर्चा झाली. मा कृषी मंत्री महोदयांनी कांदा आणि लसूण संशोधन केंद्र तसेच कला बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेले आधुनिक कांदा साठवणूक तंत्रज्त्रानाच्या २००० टन क्षमतेच्या साठवणूक युनिटला देखील भेट देऊन या आधुनिक तंत्रज्त्रानाची कार्यप्रणाली समजून घेतली. कांदा आणि लसूण संशोधन केंद्राची आढावा बैठकीला खेड तालुक्याचे माजी आमदार श्री दिलीप अण्णा मोहिते तसेच महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष श्री कैलास भोसले, वनश्री राम सुरसे,सिद्धेश वारूळे,कला बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडचे फुटाणे, कांदा लसून संशोधन केंद्र राजगुरू नगर: डॉ. विजय महाजन संचालक कांदा आणि लसूण संशोधन संचालनालय पुणे,डॉ. राजीव काळे, डॉ.भूषण बिबवे, डॉ. योगेश खाडे, डॉ.अश्विनी बेनके शास्त्रज्ञ,डॉ. जयलक्ष्मी के.आदी मान्यवर उपस्थित होते.

### संशोधन केंद्रास भेट देणारे राज्यातील दुसरे कृषीमंत्री

राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्र ही भारतीय कृषी संशोधन केंद्राच्या अंतर्गत असलेली संशोधन संस्था महाराष्ट्रातील राजगुरुनगर येथे १९९७ साली स्थापन करण्यात आली.या संस्थेत कांदा आणि लसूण या पिकांवर संशोधन केले जाते.सदर संस्थेस या अगोदर देशाचे मा. कृषीमंत्री शरद पवार यांचेनंतर माणिकराव कोकाटे यांनी भेट दिल्याबद्दल समाधान वाटले. विकसीत कांदा व लसून याचे वाण,कांदा साठवणूक, प्रतवारी पद्दत शेतकर्यांपर्यत पोहचिविणेसाठी राज्याचे कृषी मंत्री कोकाटे यांनी संस्थेस सहकार्य करावे.

**– वरिष्ठ शास्त्रज्त्र डॉ. विजय महाजन, राष्ट्रीय कांदा लसून संशोधन केंद्र, राजगुरूनगर**




# एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दरमहा होईल ७ तारखेला!

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

नाशिक । एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला होईल, याची जबाबदारी एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून माझी असेल! असे निः संदिग्ध आश्वासन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिले. ते एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताना बोलत होते.

यावेळी एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाचे सदस्य व परिवहन आयुक्त विवेक भीमनवार एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थिती होते. ते पुढे म्हणाले की, आर्थिक अडचणीमुळे एसटीत काम करणाऱ्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन केवळ ५६% देता आले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. यापुढे महिनाभर कष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याचा पगार दरमहा ७ तारखेला त्यांच्या बँक खात्यांत जमा करण्यात येईल! त्यासाठी राजशिष्टाचार सोडून महामंडळाचे अध्यक्ष म्हणून मी स्वत: अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटून विनंती करेन ! परंतु आर्थिक अडचणीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन कधीही रखडणार नाही याची जबाबदारी मी घेईन, असे निः संदिग्ध आश्वासन मंत्री सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांना दिले. यावेळी माध्यमांशी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यातील १३ कोटी जनतेला सुरक्षितता आणि किफायतशीर परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची " लोकवाहीनी" आहे. भविष्यात एसटी आर्थिक दृष्ट्या सक्षम करून प्रवासी जनतेला दर्जेदार





दळणवळण सेवा देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. अर्थात, यासाठी एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. त्यांच्या सहकार्या बरोबर शासन म्हणून सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मार्गदर्शन देखील लाभाणार आहे. यापुढे एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच परिवहन सेवा प्रवासीभिमुख व दर्जेदार करण्यासाठी काही चांगले निर्णय देखील आम्ही घेणार आहोत. त्यामध्ये सर्व बसस्थानकावरील प्रसाधनगृहे ही अत्याधुनिक पद्धतीची स्वच्छ व निर्जंतुक असतील.

### बसस्थानकांचे आधुनिकीकरण करणार

बस स्थानकाचे आधुनिकीकरण करण्यासाठी खासगी विकासकांच्या माध्यमातून बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर राज्यातील एसटीच्या बहुतांश जागा विकसित करण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६६ जागांची निविदा प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. यामध्ये संबंधित विकासकाने एसटीच्या जिल्हा स्तरांवरील जागे सह तालुका स्तरांवरील जागा व ग्रामीण भागातील जागा अशा ३ जागा विकसित करावयाची आहेत. त्यामुळे एसटीच्या अविकसित जागा देखील चांगल्या विकासकाकडून विकसित होतील.

### २५ हजार बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार

सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या सर्व जुन्या बसेस स्क्रॅप करण्यात येत असून त्याठिकाणी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येतं आहेत. यंदा २६४० लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार असून त्यापैकी ११३ आगारात ८०० पेक्षा जास्त नवीन बसेस प्रवासी सेवेत रुजू झालेल्या आहेत. सध्या ३ हजार नवीन बसेसची निविदा प्रक्रिया सुरू असून, भविष्यात ग्रामीण व दुर्गम भागात उपयुक्त ठरेल अशा मिडी बसेस घेण्यात येणार आहेत. तसेच शहरी भागातील उन्नत स्तरातील प्रवाशांसाठी २०० अत्याधुनिक, वातानुकूलित शयनयान बसेस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी घेतल्या जातील. त्यामुळे भविष्यात शहरापासून गाव खेड्यांपर्यंत, महानगरापासून आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची परिवहन सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

# गोल्ड मॉनिटायझेशन योजना बंद का झाली?

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या भावाने ऐतिहासिक उच्चांकी पातळी गाठली आहे. गेल्या आठवड्यात सोन्याचा भाव प्रती औंस ३,१२८ डॉलरवर गेला. अमेरिकेकडून जादा आयात शुल्काची आकारणी होण्याच्या शक्यतेमुळे बाजारपेठेत अनिश्चिततेचे वारे अगोदरपासूनच निर्माण झाले होते. २ एप्रिलपासून अमेरिकेने



वाढीव आयातशुल्क लागू केल्यामुळे शेअर बाजार कोसळला. त्यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याकडे वळत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव सातत्याने वाढ वाढतो आहे.

यामुळे मार्च अखेर संपलेली तिमाही ही, १९८६ नंतरची सर्वाधिक भाववाढ करणारीठरली आहे. या वर्षभरात सोन्याच्या भावात जवळपास १८% वृद्धी झाली आहे. मागच्या वर्षभरात सोन्याच्या भावात २७% वाढ झाली होती. आंतरराष्ट्रीय वायदे बाजारात सोन्याचा भाव वधारत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर समान आयात शुल्क आकारणी २ एप्रिल पासून सुरू करण्याची लागू करण्याची घोषणा केली होती. या घोषणेपासूनच शेअर बाजारात धरणीकंप झाला. तसेच वाहन उद्योगांवरील आयात शुल्कआकारणी ३ एप्रिल पासून सुरू झाली आहे. यामुळे अमेरिकेत महागाईत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच याचा फटका अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला बसण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. त्यामुळे जगभरातील भांडवली बाजार हादरले आहेत. आगामी काळातही सोन्यातील ही तेजी कायम राहील असे दिसते.'गोल्डमन सॅक्स'ने अमेरिकेतील मंदीची शक्यता व्यक्त केली असून, युरोपियन मध्यवर्ती बँकेकडून प्रत्येकी दोनवेळा व्याजदर कपात केली जाईल, असा आधीचा अंदाज होता. आता प्रत्येकी तीनवेळा व्याजदर कपात होईल, अशी शक्यताही व्यक्त केली गेली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, सार्वभौम सुवर्णरोखे योजनेमागोमाग केंद्र सरकारने जीएमएस, म्हणजेच गोल्ड मोनेटायझेशन स्कीमही आता बंद केली आहे. या योजनेअंतर्गत मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या ठेवी घेण्याचे २६ मार्च २०२५ पासून थांबवण्यात आले आहे. नोव्हेंबर २०१५ मध्ये जीएमएचा शुभारंभ करण्यात आला होता. ग्राहकांनी या योजनेअंतर्गत आपले सोने विकावे किंवा बँकांमध्ये ठेवावे. त्याद्वारे हे सोने औपचारिक अर्थव्यवस्थेत विलीन होईल. त्यामुळे सोन्याची आयात कमी होऊन, त्यावर खर्च होणारी परकीय गंगाजळी वाचेल व परिणामी चालू खात्यावरील तूट कमी होईल, असा सर्व हिशेब होता. देशात लाखो लोकांकडे सोने पडून असते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या संस्था आणि ट्रस्ट्सकडेही सोने असते. यापैकी काहीसाठा जीएमएसकडे वळला. पूर्वीदेखील गोल्ड डिपॉझिट स्कीम किंवा सुवर्ण ठेव योजना होती. त्याचेच नवे रूप म्हणजे जीएमएस. या योजनेमध्ये एक ते तीन वर्षे मुदतीच्या, म्हणजेच अल्पमुदतीची, पाच ते सात वर्षांची मध्यम मुदतीची सरकारी ठेव योजना होती. त्याचप्रमाणे १२ ते १५ वर्षांची दीर्घकालीन ठेव योजना होती. ही ठेव किमान दहा ग्रॅम सोन्याच्या स्वरूपात (लगड, नाणे आणि फक्त मौल्यवान खडे आणि इतर धातूंचा अपवाद करता बनलेले दागिने) ठेवणे गरजेचे होते. कमाल मर्यादा कोणतीही नव्हती. आंतरराष्ट्रीय लीज दर, अन्य खर्च आणि एकूण बाजारातील वातावरण विचारात घेऊन, या सुवर्ण ठेवींवर किती व्याज द्यायचे, हे ठरवण्याचे स्वातंत्र्य बँकांना होते. मध्यम आणि दीर्घकालीन ठेवींवरील व्याज मात्र सरकार ठरवत होते. अर्थात त्याबाबत रिझर्व्ह बँकेशी चर्चा केली जात होती. मध्यम मुदतीच्या रोख्यांवर सव्वादोन टक्के आणि दीर्घकालीन रोख्यांवर अडीच टक्के व्याज दिले जाते.

आता केंद्रीय अर्थखात्याने अल्पकालीन ठेव योजना,म्हणजेच गोल्ड मॉनिटायझेशन स्कीम थांबवण्याचे ठरवले आहे. अर्थात जीएमएस बंद झाली, याचा अर्थ विद्यमान मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या सरकारी ठेवींवर याचा कोणताही परिणाम होणार नाही. त्यांची मुदत संपेपर्यंत त्या चालूच राहतील. सोन्याच्या भावातील चढ-उताराचा किती वेगवेगळ्या स्तरांवर परिणाम होतो हे दिसतच आहे. नोव्हेंबर २०२४पर्यंत जीएमएस योजनेअंतर्गत ३१,१६४ किलो सोने जमा झाले होते. त्यापैकी ७,५०९ किलो सोने अल्पमुदत ठेवीच्या रूपाने, ९,७२८ किलो मध्यम मुदतीच्या ठेवीत आणि १३,९२६ किलो हे दीर्घकालीन ठेवींकडे आकर्षित झाले होते. जीएमएसमध्ये ५.६९३ ठेवीदारांनी भाग घेतला. २०१६-१७ आणि२०१७-१८ या वर्षांत १,१३४ किलो सोने या योजनेअंतर्गत जमा झाले होते. शिवाय मंदिरे, विश्वस्त संस्था, म्युच्युअल फंड, गोल्ड ईटीएफ आणि कंपन्या व पेढ्या यांच्याकडून १०,८७२ किलो सोने जीएमएस अंतर्गत गोळा झाले आहे.

गेल्या जवळपास सुमारे सव्वा वर्षात सोन्याचे भाव दहा ग्रॅमला जे ६३ हजारच्या आसपास होते, ते आता ९३,००० च्या पुढे गेले आहे. म्हणजे त्यात ४१ टक्क्यांची वाढ झाली आहे. भारतात २४ हजार टनांपेक्षा जास्त पिवळा धातू लोकांकडे आहे. ०१५ मध्ये सरकारने ही मानसिकता ओळखली आणि लोकांना भौतिक सोन्यापासून दूर नेऊन 'डिजिटल गोल्ड' योजनांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी विविध गुंतवणुकीच्या योजना आणल्या. तथापि, दोन प्रमुख उपक्रम सुवर्ण बचत ठेव योजना आणि सार्वभौम सुवर्ण रोखे या योजना आता बंद करण्यात आल्या आहेत. आणि या अनपेक्षित निर्णयामुळे घाबरून जाण्याचे काहीच कार नाही. अल्पकालीन योजना चालू राहणार आहेत. सुवर्ण मुद्रीकरण योजनेमागील कल्पना भारतीय घरे आणि मंदिरांमध्ये पडलेल्या सोन्याच्या प्रचंड साठ्याची जमवाजमव करण्याचा होता. लोक त्यांचे न वापरलेले सोने बँकांमध्ये जमा करतील आणि त्यावर व्याज मिळवतील अशी आशा होती. सरकार या सोन्याचा वापर देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी करू शकेल, असे वाटत होते; परंतु दुर्दैवाने, वस्तुस्थिती अगदी वेगळी असल्याचे दिसून आले. २०१५ मध्ये लॉंच झाल्यापासून ही योजना केवळ ३१.१६ टन सोने गोळा करू शकली आहे, जी खासगी हातात असलेल्या एकूण सोन्याच्या तुलनेत नगण्य रक्कम आहे. सुवर्ण मुद्रीकरण योजनेची समस्या तिच्या अंमलबजावणी आणि आव्हानांत आहे. बरेच लोक त्यांचे भौतिक सोने देण्यास संकोच करत होते, विशेषत: जेव्हा त्यात शुद्धता पडताळणी, वितळणे आणि कर आकारणीच्या समस्यांचा समावेश होतो. भारतातील सोन्याशी जोडलेल्या भावनिक आणि सांस्कृतिक मूल्यामुळे कुटुंबांना त्यांचे दागिने स्वेच्छेने बँकांकडे सोपवणे कठीण झाले; शिवाय ऑफर केलेले व्याजदर २.२५ ते २.५० टक्के फारच कमी होते. गुंतवणूकदारांना मुदत ठेवी किंवा रिअल इस्टेट सारख्या पारंपारिक मालमत्तांपासून दूर ठेवण्यासाठी पुरेसे आकर्षक नव्हते. याउलट, सार्वभौम गोल्ड बॉंड्सचा कागद आणि भौतिक सोन्याला डिजिटल पर्याय म्हणून सादर करण्यात तुलनेने मोठे यश मिळाले. सरकारने हे रोखे नियमित अंतराने जारी केले. त्यामुळे गुंतवणूकदारांना २.५ टक्के व्याजदर मिळून गैर-भौतिक स्वरूपात सोने खरेदी करता येते.

भारतातील सोन्याची आयात कमी करण्यासाठी आणि डिजिटल सोन्याच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी या योजना सुरू केल्या गेल्या असल्या, तरी त्यांनी आर्थिक समस्या सोडवण्याऐवजी आर्थिक भार निर्माण केला. त्यांना चालू ठेवणे सरकारला आता परवडणारे नाही. त्यांचे व्यवस्थापन करण्याची किंमत ही एक प्रमुख चिंता बनली. मार्च २०२५ पर्यंत, सरकारने १३० टन सोन्यासाठी सार्वभौम सुवर्ण रोखेधारकांना ६७,३२२ कोटी देणे बाकी आहे. सोन्याच्या किमतीत वाढ झाल्यामुळे एकूण मुख्य कर्जाच्या ओझ्यात सुमारे ७९ टक्क्यांची तीव्र वाढ आहे. याव्यतिरिक्त, सरकारला या रोख्यांवर वार्षिक २.७५ टक्के व्याज द्यावे लागले. त्यामुळे आर्थिक दबाव आणखी वाढला. उदाहरणार्थ, पहिल्या सार्वभौम सुवर्ण रोखे हप्त्याची पूर्तता १२८ टक्के प्रीमियमवर करायची होती. सरकारने व्याज देयके समाविष्ट केल्यावर एकूण १४८ टक्के जास्त रक्कम दिली. त्यानंतरच्या टप्प्यातही अशीच वाढ दिसून आली.

**देशभरात नवनवीन रस्ते, इमारती, धरणे, पूल उभे रहात असल्याने भारताची पेट्रोलियम उत्पादनांची मागणी वाढली असून आपल्याला ८८ टक्के कच्चे तेल आयात करावे लागत आहे. सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या तेलाबाबत स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या दिशेने झटण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात भारताचे परावलंबित्व वाढतच चालले असून अर्थव्यवस्थेला अधिकाधिक फटका बसू लागला आहे.**

गुंतवणूकदारांसाठी एकूण परतावा १४२ ते १६२ टक्क्यांपर्यंत आहे. या वाढत्या किमतीमुळे, नवीन सार्वभौम सुवर्ण रोखे खंड फेब्रुवारी २०२४ नंतर बंद करण्यात आले आणि 'गोल्ड मॉनेटायझेशन' योजना सरकारने २६ मार्च २०२५ रोजी तिच्या खराब कामगिरीमुळे पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला. सार्वभौम सुवर्ण रोखेचे अजूनही स्टॉक एक्स्चेंजवर व्यवहार केले जाऊ शकतात.. तथापि, तरलतेची चिंता आणि चढ-उतार प्रीमियम दीर्घकाळात त्यांच्या आकर्षकतेवर परिणाम करू शकतात. सर्वात सोयीस्कर पर्यायांपैकी एक म्हणजे 'गोल्ड एक्स्चेंज-ट्रेडेड फंड.' ईटीएफ आणि गोल्ड फंड्स सारखे डिजिटल गोल्ड पर्याय अजूनही उपलब्ध आहेत. गुंतवणूकदारांसाठी सोने कुठेही जात नाही.

येत्या काळात ट्रम्प यांनी आणखी काही घातक आर्थिक धोरणे आणली, तर सोन्याच्या भावांवर तसेच शेअर बाजारावरदेखीलपरिणाम होईल.अशावेळी केंद्र सरकारला सुवर्ण ठेव योजनेचादेखील आमूलाग्र फेरविचार करणे भाग पडेल.



परामर्श

**हेमंत देसाई**, ज्येष्ठ पत्रकार

# यंदा उन्हाळा जास्त त्रासदायक; काळजी घ्या

**यंदाचा उन्हाळा नेहमीपेक्षा अधिक जाचक ठरत असून सामान्यजनांना अक्षरश: पिळून काढत आहे. येणाऱ्या इतर कोणत्याही ऋतुप्रमाणे उन्हाळ्यातही आपल्या रोजच्या दिनक्रमातल्या काही सवयींना मुरड घालून, आणि खायच्या प्यायच्या पदार्थांचे तब्येतीला अनुसरून नियोजन करावे लागते. यंदा अशी काळजी हटकून घ्यावी लागत आहे. तसे केले तरच हा उन्हाळा सुसह्य होण्यास मदत मिळेल आणि ते आपल्या फायद्याचे असेल.**

वेध

**मधुरा कुलकर्णी**

मार्च, एप्रिल, मे आणि जून महिन्याचा पहिला पंधरवडा उन्हाळ्याचा मोसम मानला जातो. यंदा मार्चमध्ये उन्हाळ्याची एवढी झळ आणि उकडा जाणवला नाही; तो आता जाणवू लागला आहे. यंदा एकूणच थंडीचा म्हणावा तसा जोर नव्हता, पण उन्हाळा मात्र तीव्र असेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. साधारणतः एक ऋतू बदलून दुसरा ऋतू सुरू होतो, तेव्हा मानवी शरीराला दोन्ही ऋतूंमधील बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना बऱ्याच समस्यांशी सामना करावा लागतो. प्रत्येकाचे वय आणि प्रकृती यांचा विचार करता या समस्या वेगवेगळ्या असू शकतात. त्या दृष्टीने प्रथमोपचार म्हणून या वातावरणात काही आवश्यक काळजी बाळगली आणि नियम पाळले तर पुढे तोंड द्याव्या लागणाऱ्या उन्हाळ्याच्या दाहकतेवर आपण बऱ्याच प्रमाणात मात करू शकू. विशेषतः बालक, रुग्ण आणि ज्येष्ठांची तब्येत या ऋतुंमध्ये जपणे आवश्यक आहे.

मानवी शरीराचे साधारण तापमान ३६.५ ते ३७.५ डिग्री सेल्सियस (९७.७ ते ९९.५ डिग्री फॅरेनहाइट) असते, हे सरासरी ३७ अंश सेल्सियस (९८.६ डिग्री फॅरेनहाइट) मानले जाते. शरीराचे तापमान व्यक्ती, वय आणि दिवसाच्या वेळेनुसार थोडे बदलू शकते. सकाळी तापमान थोडे कमी आणि संध्याकाळी थोडे जास्त असू शकते. १००.४ (३८) किंवा त्यापेक्षा जास्त तापमान असणे म्हणजे ताप आला, असे मानले जाते आणि ९५ पेक्षा कमी तापमान हायपोथर्मिया मानले जाते. तापमान ३९-४० सेल्सिअस झाले की मेंदू स्नायूंना काम थांबवण्याचे संदेश पाठवतो आणि थकवा लगेच वाढतो. तापमान ४१ सेल्सिअसपेक्षा जास्त झाले की, शरीरात महत्त्वपूर्ण बदल होऊ लागतात. जास्त तापमानामुळे प्रथिने नष्ट होऊ शकतात आणि मेंदूचे कधीही भरून न येणारे नुकसान होऊ शकते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात या दृष्टीने विशेष काळजी घेणे जरुरीचे असते. शरीरातील उष्णता वाढल्याने अशा उच्च तापमानात, जास्त घाम येऊन शरीराचे निर्जलीकरण आणि इलेक्ट्रोलाइट असंतुलन होऊ शकते. मेंदूचा रक्तप्रवाह बिघडू शकतो आणि शुध्द हरपण्याचा धोका वाढतो. यामुळे अतिरिक्त दुखापत होऊ शकते.

उन्हाचा आणि उकाड्याचा त्रास होऊ नये म्हणून उन्हाळ्यात अपारदर्शक, जाड आणि गडद रंग टाळावेत, कारण ते शरीरात उष्णता साठवतात. कापूस शरीरातील घाम सहज शोषून घेतो. त्यामुळे शरीर कोरडे राहण्यास मदत होते. लोकरीच्या कपड्यांच्या तुलनेत कापसाच्या कपड्यांमध्ये बारीक धागे असतात. त्यामुळे हवा सहजपणे जाऊ शकते. उन्हाळ्यात हिरव्या, फिकट पिवळ्या आणि लिंबाच्या रंगासारख्या कपड्यांची निवड केल्यास ते फायदेशीर असते. उन्हाळ्यात कधीही कृत्रिम कपडे वापरू नका, कारण या कपड्यांमध्ये आपल्या शरीरातील घाम जलद गतीने शोषण्याची क्षमता नसते. त्यामुळे शरीर सतत घामाजलेले राहिल्याने घामोळे होण्याची शक्यता असते.



उन्हाळ्यात संतुलित आहार घेण्याचा डॉक्टर सल्ला. देत असतात. शरीर थंड ठेवण्यासाठी, आपण काकडी, टरबूज, नारळपाणी, लिंबू पाणी आणि पुदिना यांसारखे पदार्थ आहारात समाविष्ट करणे आरोग्यदायी असते. हे पदार्थ शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात आणि उष्णता कमी करतात. आहारात पोषक घटक असलेले पदार्थ असावेत. शरीराला आवश्यक असणारे पोषक घटक म्हणजे पाणी, प्रथिने, कर्बोदके, चरबी, जीवनसत्त्वे आणि खनिजे. हे सर्व घटक आपल्या शरीराच्या योग्य कार्यासाठी आणि आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. दैनंदिन आहारात प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, पाणी, जीवनसत्त्व व खनिज द्रव्ये यांचे योग्य प्रमाण असावे. रोजच्या आहारात कच्च्या पालेभाज्या व भारतीय पद्धतीच्या कोशिंबीरीचे वेगवेगळे प्रकार खावेत. उन्हाळ्यात उष्ण झळांमुळे कार्यक्षमतेवर परिणाम होत असतो, त्यामुळे खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. उन्हाळ्यात दुग्धजन्य पदार्थ, विशेषत: दही आणि ताक, शरीराला थंडावा आणि आवश्यक पोषक तत्वे देण्यासाठी फायदेशीर असतात, म्हणून आहारात यांचा समावेश करणे योग्य आहे.

उन्हाळ्यात शरीराला थंडावा देणारी इतरही पेये आहेत. जांभळाच्या रसामध्ये लोह आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. ते डिटॉक्सिफिकेशनला मदत करते आणि त्वचेच्या आरोग्यासाठी चांगले असते. पपईच्या रसामध्ये फायबर आणि पेपेन-उत्पादक एंजाइम असतात. त्यामुळे पचन आणि वजन कमी करणे चांगले असते. आंबा, आले, केशर आणि गूळ यांचे पेय म्हणजे पन्हे हे उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी चांगले असते. लस्सी हे एक अष्टपैलू पेय आहे. ते त्याच्या थंड प्रभावासाठी ओळखले जाते. अशी पेये घेतल्याने शरीरात हायड्रेशन स्तर वाढतो आणि ताजेतवाने वाटते. उन्हाळ्यात प्यायला चांगली असणारी काही नैसर्गिक पेये आरोग्याच्या दृष्टीनेही चांगली असतात. विविध प्रकारच्या नैसर्गिक पेयांचे विविध पर्याय बाजारात उपलब्ध असतात, ती आरोग्यासाठी सर्वोत्तम आहेत. बाजारात मिळणाऱ्या शीतपेयांनी शरीराला तात्पुरता थंडावा मिळतो, अशी पेये पिणे टाळावे.

उन्हाळ्यात बार्बेक्यूमधील जेवण मजेदार वाटत असले तरी बाहेरील तापमानापेक्षा जास्त तापमानात शिजवलेले ग्रील्ड मांस कार्सिनोजेन्सची पातळी वाढवते. त्यामुळे कर्करोगाचा धोका दुप्पट होतो. तळलेले जंक फूड उन्हाळ्याच्या दिवसात दूर ठेवणे तब्येतीच्या दृष्टीने चांगले असते. आधीच उष्ण असलेल्या दिवसात तळलेले अन्न त्वचा अधिक तेलकट बनवते. त्यामुळे त्वचेच्या मुरुमांसारख्या समस्या उद्भवतात. शिवाय पचनक्रियेतही व्यत्यय येतो. सकाळी गरम कॉफी किंवा चहा घेण्यापेक्षा ग्रीन टी किंवा आइस्ड कॉफी आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते. फळांचा राजा आंबा उन्हाळ्यातच येत असला तरी, जास्त प्रमाणात खाल्ल्यास त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. ते त्याच्या चवीच्या गोडव्याइतकेच असू शकतात. आंब्यामध्ये शरीराची उष्णता वाढवण्याची आणि अतिसार, पोटदुखी, डोकेदुखी इत्यादी अनिष्ट लक्षणे निर्माण करण्याची क्षमता असते. थंड मिल्कशेक पिणे हा उष्णतेपासून वाचण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे असे वाटू शकते, परंतु ते खरे नाही. बाहेरील तापमान जास्त असते तेव्हा चीज, लोणी आणि दही यांसारखे दुग्धजन्य पदार्थ शरीरात किण्वन प्रक्रिया करतात. यामुळे अपचन आणि पोटाशी संबंधित इतर आजार होऊ शकतात.

डिश सजवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सॉसमध्ये जास्त कॅलरीज असतात. त्यामुळे व्यक्ती सुस्त आणि आळशी वाटू शकते. चीज सॉसमुळे केवळ तापमानच वाढत नाही, तर अपचनदेखील होते. ते टाळणे चांगले. जेवण अधिक स्वादिष्ट बनवणारे वेलची, दालचिनी, लवंग, काळी मिरी इत्यादी मसाले भारतीय पदार्थांमधील ठळक वैशिष्ट्ये आहेत. तथापि, उन्हाळ्यात मसालेदार पदार्थ हा चांगला पर्याय असू शकत नाही. मसाले शरीरातील उष्णता आणखी वाढवू शकतात. त्यामुळे व्यक्ती डिहायड्रेटेड आणि आजारी होऊ शकते. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त लोकांच्या जेवणात असलेली गव्हापासून बनवलेली पोळी विशिष्ट प्रमाणात उष्णता निर्माण करते. त्यामुळे पचन प्रक्रिया कठीण होते. म्हणून उन्हाळ्यात भात खाणे योग्य ठरते.



उन्हाळ्यामध्ये मक्यापासून बनवलेली रोटी शरीरासाठी कधीही उत्तम असते. मक्यामध्ये ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारखे अँटीऑक्सिडंट्स असतात. ते उन्हाळ्यात सेंद्रिय आणि ताजे राहण्यास मदत करतात. मका अँटी-एजिंग गुणधर्मांसाठीही ओळखला जातो. टोमॅटोला उन्हाळ्यासाठी सनस्क्रीन मानले जाते. कॅरोटीनॉइड्सच्या उपस्थितीमुळे आणि लाल रंगामुळे ते सूर्यप्रकाशापासून संरक्षणात्मक एजंट म्हणून काम करते. टरबूज हा पाण्याचा चांगला स्रोत आहे आणि त्यातले आवश्यक पोषक घटक उन्हाळ्यात शरीराला थंड ठेवतात. एकंदरीत, मोठ्या प्रमाणात वाढत असलेल्या उन्हाळ्यामध्ये स्वत:ला जपणे आणि योग्य पदार्थांचे, फळांचे सेवन करणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने माहिती घेणे आणि जीवनशैली थोडी बदलणे अत्यावश्यक ठरते.

# ट्रम्प (असे) कसे घडले?

ट्रम्प यांचे वडील फ्रेड हे अत्यंत कठोर स्वभावाचे रिअल इस्टेट व्यावसायिक होते. त्यांनी आपल्या मुलाला लहानपणीच शिकवले.. जगात फक्त दोन प्रकारचेच लोक असतात. पहिला प्रकार जिंकणाऱ्यांचा किंवा मारणाऱ्यांचा आणि दुसरा प्रकार हरणाऱ्यांचा वा पराजित होणाऱ्यांचा.. या संस्कारांतून वाढलेल्या ट्रम्प यांनी फक्त आणि फक्त जेते किंवा विजयी होण्याचा दृढनिश्चय केला.

---------------

सध्या जगभर ट्रम्प नावाच्या वादळाने हडकंप निर्माण केला आहे. पहिल्यांदाच अमेरिकेच्या तथाकथित शत्रू राष्ट्रांबरोबरच मित्र राष्ट्रांचेही धाबे दणाणले आहे. गंमत म्हणजे, समस्त अमेरिकाही या वादळातून सुटलेली नाही. संपूर्ण जगाप्रमाणेच अमेरिका कुठे जाणार, याबाबत कोणतेही मतैक्य नाही.

ट्रम्प एक तर अमेरिकेला अत्युच्च शिखरावर नेणार किंवा त्यांच्या धोरणांमुळे अमेरिका रसातळाला जाणार, असे दोन टोकाचे तर्क सध्या मांडले जात आहेत. या रणधुमाळीचे मुख्य कारण अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फक्त दोनेक महिन्यांत शंभराहून अधिक असे कार्यकारी आदेश (फतवे) काढले आहेत. आणि हा सपाटा सुरूच आहे. त्यामुळेच जगभर चिंतेचे सावट आणि काळजीचे वातावरण पसरले आहे.

आपल्यावर केव्हा गाज कोसळणार, याची प्रत्येक देशाला दहशत वाटत आहे. राजा कालस्य कारणम् या वचनाचा शब्दशः अर्थ राजा हा काळ घडवतो, असा होतो. प्रत्यक्षात मात्र आपण दोन अर्थ काढू शकतो. पहिला, वर सांगितल्याप्रमाणे आपल्या कार्यकाळावर त्या राजाच्या कर्तृत्वाची पदचिन्हे स्पष्ट दिसतात. तो राज्याला भरभराटीला आणतो, जनतेचे भविष्य उज्ज्वल करतो, असा होतो.

दुसरा अर्थ, राजा काळाचे कारण असतो / ठरतो. काळ याचा अर्थ मृत्यू किंवा सर्वनाश असा घेतला जाऊ शकतो. सुवर्णकाळ आणि कर्दनकाळ असे दोन्ही काळ राजाच्या रुपाने जनतेसमोर येतात. या अर्थाने जगातल्या सर्वांत शक्तिशाली अमेरिकेसाठी ट्रम्प काय ठरतील, तेही काळच सांगेल.

एखाद्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचे किंवा व्यक्तित्वाचे विश्लेषण अनेक पद्धतीने करता येते. उदा. त्या व्यक्तीच्या निर्णयाची चिरफाड करणे, त्याच्या मित्रमंडळींचा विचारपूर्वक अभ्यास करणे, त्याच्या भूतकाळातील वर्तणुकीची तर्कसंगत मांडणी करुन काही निष्कर्ष काढणे.

पण, याचबरोबर अनेक मानसशास्त्रज्ञ सांगतात की, व्यक्तीच्या बालपणाचा त्याच्या पुढच्या आयुष्यावर आणि कर्तृत्वावर खोल परिणाम होतो. त्यात परिवाराची पार्श्वभूमी, आर्थिक स्थिती, संस्कार, स्वभाव, परिसर या सर्व गोष्टींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे शिक्षण, धर्म आणि मित्र परिवार या गोष्टींचाही खोलवर परिणाम होतोच; पण नंतरच्या काळात या गोष्टी विविध पद्धतीने प्रकट होतानाही जाणवतात.

उदा. संत ज्ञानेश्वरांच्या बालपणी आलेल्या कटू अनुभवाने त्यांना फक्त शहाणे केले नाही, तर जगाकडे पाहण्याचा एक उदार दृष्टिकोन तयार झाला. म्हणूनच ते संत आणि तत्त्वज्ञ झाले.

हिटलरच्या बाबतीत सांगायचे झाले तर, जर्मनीविषयीचा राष्ट्रवाद लिओपोल्ड पोएश या त्याच्या माध्यमिक शाळेतच किशोरवयात त्याला प्रभावित करुन गेला. त्याचे शिक्षण अपूर्ण राहिले, कलाकार होण्याचे स्वप्नही पूर्ण झाले नाही आणि त्याला मजुरी करत निराश्रितासारखे वसतिगृहे बदलत जगावे लागले. या सर्वच गोष्टींचा त्याच्या मनावर गंभीर परिणाम झाला असावा आणि त्यातूनच पुढच्या हिटलर होण्याचे बीजही रुजले असणार.

ट्रम्प यांच्या बाबतीत नेमके काय घडले? त्यांचा डीएनए नेमका काय आहे? परिवार, शिक्षण, शाळा, मित्र, परिसर या सर्व गोष्टी कशा होत्या? या गोष्टींचा विचार केला, तर ट्रम्प नेमके कोण आहेत, हे समजायला मदत होईल. ट्रम्प यांच्या मनात डोकावायचे असेल, तर त्यांच्या बालपणाकडे वळून पाहावे लागेल.



ज्ञानेश्वर मुळे

ट्रम्प यांचे वडील फ्रेड हे अत्यंत कठोर स्वभावाचे रिअल इस्टेट व्यावसायिक होते. त्यांनी आपल्या मुलाला अगदी लहानपणीच शिकवले.. जगात फक्त दोन प्रकारचेच लोक असतात. पहिला प्रकार जिंकणाऱ्यांचा किंवा मारणाऱ्यांचा आणि दुसरा प्रकार हरणाऱ्यांचा वा पराजित होणाऱ्यांचा. जेते आणि पराभूत हे दोनच प्रकार.

ट्रम्प याच संस्कारांतून वाढल्याने त्यांनी फक्त आणि फक्त जेते किंवा विजयी होण्याचा दृढनिश्चय केला. फ्रेड अजिबात संवेदनशील पिता नव्हते. कडक स्वभावाचे आणि प्रेम, आपुलकी या शब्दांपासून ते खूप दूर होते. म्हणून त्यांनी आपल्या मुलाला शिक्षणासाठी तेराव्या वर्षी लष्करी शाळेत पाठवले. उद्देश अतिशय स्पष्ट होता.. तिथे इतरांवर अधिकार गाजवून नियंत्रण ठेवण्याचे शिक्षण मिळावे. त्यांचा चरित्रकार टिमोथी ओब्रियन यांनी, लष्करी शाळेतील सुरूवातीच्या काळातच रांगेत उभे राहिल्याने डोनाल्डच्या थोबाडीत मारले गेले, याविषयी लिहिले आहे.

अनेकांच्या मते, त्या शाळेतील पाच वर्षांत इतरांना ताब्यात ठेवण्याचे प्रशिक्षणच या महाशयांनी घेतले. ट्रम्प यांच्या नेतृत्व शैलीतील इतरांवर प्रहार करण्याचे, दुसऱ्यांना कमी लेखण्याचे, त्यांची खिल्ली उडवण्याचे कौशल्य ते या शाळेतच शिकले.

डोनाल्ड ट्रम्प यांचे आपल्या आईशी असलेले नातेही फारसे प्रेमाचे नसावे. ते अडीच वर्षांचे असताना ती गंभीर आजाराने पडून राहिली. त्यामुळे आईच्या वात्सल्याच्या आठवणी ट्रम्प यांच्याकडे नाहीत. लहान डोनाल्डला इतर कुठल्याही मुलांप्रमाणे काळजी घेणारी आई हवी होती. पण, तो व्याकूळ होऊन ओरडायचा, तेव्हा त्याच्यावर रागावले जायचे. आणि त्यापेक्षा वाईट म्हणजे, त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जायचे.

आईवडिलांच्या प्रेमाला पारखा झालेल्या डोनाल्डच्या व्यक्तित्वावर या वातावरणाचा फार जबरदस्त परिणाम झाला. आज ट्रम्प काही गोष्टी का करताहेत, याचा उलगडा बालवयातील डोनाल्डच्या अतृप्त भावनिक आणि मानसिक भुकेच्या शोधातून होऊ शकतो. अलीकडेच देशांतर करुन आलेल्या छोट्या मुलांना परिवारापासून अलग करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

कृष्णवर्णीय जनतेवरची पाळत वाढवली, पहिल्या कारकिर्दीत भाषणांमध्ये कोरोनाविषयी कधीच गांभीर्य दाखवले नाही. या आणि अशा अनेक गोष्टींच्या तारा ट्रम्प यांच्या बालवयातील जडणघडणीशी जोडलेल्या असाव्यात, असे वाटते. मेरी ट्रम्प या त्यांच्या पुतणीने लिहिलेल्या, 'Too Much and Never Enough : How My Family Created the World's Most Dangerous Man' हे पुस्तकाचे शीर्षक सर्व काही सांगून जाते.

थोडक्यात सांगायचे तर, ट्रम्प कुटुंबाने जगातील सर्वात धोकादायक माणूस कसा तयार केला? असे या पुस्तकाचे नाव आहे. त्यामुळेच, दुर्लक्षित बालपणातूनच इतरांच्या विचारांकडे दुर्लक्ष करणारे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प तयार झाले नाहीत ना, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही.

■ ■ ■




# मनोरुग्णतेच्या दिशेने

सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारा माझा एक मित्र मराठवाड्यातील लातूर या जिल्हयात वरिष्ठ अधिकारी म्हणून रुजू झाला. तो मुंबईला असताना त्याची नेहमी भेट व्हायची. आता तो लातूरला गेल्यामुळे त्याची भेट दुर्लभ झाली आहे. म्हणून मी त्याला भेटण्यासाठी मुद्दाम लातूरला गेलो. दुपारी डब्बा खात असताना तो एका व्यक्तीची ओळख करून देत मला म्हणाला, 'हे राजीव कुलकर्णी, अमेरिकेत होते. अमेरिकेत त्यांनी भाडेतत्त्वावर जमीन घेऊन खूप वर्ष कसली. आता कुलकर्णी काही कारणास्तव लातूरमध्ये वापस आले आहेत. माझे जवळचे मित्र आहेत'.

मी कुलकर्णी यांना नमस्कार केला. बराच वेळ गप्पा मारल्यावर कुलकर्णी वरिष्ठ अधिकारी असलेल्या माज्या मित्राला म्हणाले, 'मी खूप अडचणींत आहे. त्यातून मार्ग कसा काढावा यासाठी मी येथे आलो आहे'. ते वरिष्ठ अधिकारी मित्र म्हणाले, 'बोला ना'. माझ्याकडे बघत ते मित्र दबक्या आवाजात म्हणाले, 'माझा मुलगा समर्थ आता आठवीला आहे. गेल्या दोन वर्षांपासून तो व्यसनाधीन झालाय. आम्ही अमेरिकेत खूप इलाज केले, पण उपयोग झाला नाही. म्हणून आम्ही अमेरिका सोडून पुन्हा गावी लातूरला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला'.

माझे अधिकारी मित्र त्यांना म्हणाले, 'तो इतका व्यसनाच्या आहारी गेला, तेव्हा तुम्ही काय करत होतात? कुलकर्णी म्हणाले, 'मी माझ्या शेती उपक्रमात होतो. माझी बायको यमुना नोकरी करायची. तो नाना प्रकारचे व्यसन करायचा. आम्हाला कळू न देता गोळ्या खायचा'.

कुलकर्णी त्यांच्या मुलाच्या व्यसनाधीनतेचे किस्से सांगत होते आणि आम्ही अवाक होऊन ऐकत होतो. कुलकर्णी यांच्या आपबीतीने माझे हातपाय एकदम गळून गेले. आम्ही एकदम निःशब्द झालो. सर्व सांगून झाल्यावर कुलकर्णी यांनी खिशातला रुमाल काढून आसवांनी डबडबलेले डोळे पुसले. माझ्याकडे बघत माझा तो अधिकारी मित्र म्हणाला, 'या स्वरूपाच्या तक्रारी माझ्याकडे दररोजच्या आहेत. आईवडलांना मुलांकडे बघायलाही वेळ नाही. आणि सहज करता येतात म्हणून मुले व्यसनांचे अनेक प्रयोग करतात.

अधिकारी मित्राने बेल वाजवून शिपायाला बोलवले. ते त्या शिपायाला म्हणाले, 'जरा विजयकुमार यादव सर यांना फोन करून बोलावून घ्या'. शिपाई गेला. कुलकर्णी यांनी अमेरिकेसह भारतातही पालकांच्या लाडामुळे, दुर्लक्षामुळे लहान लहान मुले खूप मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन झाली आहेत. अनेक मुले व्यसनाधीनतेच्या मार्गावर आहेत. नशील्या पदार्थांच्या सेवनाबरोबर मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे अनेकांचा कसा सत्यानाश झाला. आज दहावीच्या आतमध्यली ३० टक्के मुले व्यसनाधीनतेच्या आहारी गेल्याचे कुलकर्णी आणि वरिष्ठ अधिकारी मित्राच्या बोलण्यातून समजले.



संदीप काळे

sandip98868@gmail.com
9890098868

इतक्यात यादव सर आले. यादव सरांची ओळख करून देताना अधिकारी मित्राने सांगितले, 'हे यादव सर. यांनी आजवर तब्बल दोन पिढ्यांना व्यसनाच्या खाईत जाण्यापासून वाचवले आहे. मी अनेक वेळा त्यांच्या व्यसनमुक्ती सेंटरला जाऊन आलो. मी अनेक माणसं त्यांच्याकडे पाठवली. यादव सरांनी अनेकांचे संसार वाचवण्याचे काम केले आहे. त्यांच्या कामाचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. वरिष्ठ अधिकारी मित्र आणि कुलकर्णी यांनी त्यांच्या मुलाची सर्व परिस्थिती यादव सरांना सांगितली.

यादव सर म्हणाले, 'लहान मुलांच्या व्यसनाचा प्रकार खूप वाढलाय. बरं, या मुलांचे काय करायचे हा प्रश्न आहे. मोठ्या माणसांप्रमाणे त्यांना कोणत्याही व्यसनमुक्ती केंद्रात ठेवता येत नाही. लहान मुलांसाठी खूप कडक कायदे आहेत. त्यामुळे या लहान मुलांचं काहीही करता येत नाही. न्यायाधीश, जिल्हाधिकारी, समाज कल्याण अधिकारी, पोलीस अधिकारी या सगळ्यांनाच रोज त्यांच्याकडे येणाऱ्या लहान मुलांच्या व्यसनाधीनतेवर करायचे काय हा प्रश्न आहे. वरिष्ठ अधिकारी असलेले मित्र मला म्हणाले, 'संदीपराव, तुम्ही एकदा जाऊन यादव सर करत असलेलं काम पाहून या. तुमच्या लक्षात येईल, त्यांचं काम किती मोठे आहे!'

अधिकारी मित्र यादव सरांविषयी भरभरून बोलत होते. मलाही यादव सर यांचे काम जाणून घ्याण्याची उत्सुकता लागली होती. कुलकर्णी यांना यादव सरांनी त्यांच्या मुलाला व्यसनाधीनतेतून बाहेर कसे काढायचे, याबाबत योग्य तो सला दिला. त्या मुलांचे समुदेशन कसे करायचे, कोणते औषध द्यायचे हे सांगितले. मुलाला वेळ देणे, मुलावर खूप प्रेम करणे, त्यांना समजून घेणे किती गरजेचे आहे, हे यादव सर यांनी समजावून सांगितले. तुम्हाला जर या मुलांना खरंच व्यसनांतून बाहेर काढायचे असेल तर, तुम्हाला वैयक्तिक त्यांना वेळ द्यावा लागेल. तरच ती बाहेर येतील, अन्यथा येणार नाहीत.

अधिकारी मित्र आणि कुलकर्णी हे दोघे बोलत बसले.

मी उठलो आणि यादव सरांसोबत त्यांच्या आंबेजोगाई रोडवर असलेल्या व्यसनमुक्ती सेंटरमध्ये जाऊन पोहोचलो. दारू, गांजा अशा अनेक व्यसनांच्या आहारी गेलेल्या शेकडो लोकांचा तिथे इलाज केले जात होते. लातूरमधलं हे व्यसनमुक्तीचं सेंटर कसं सुरू केलं? त्या एका सेंटरचे अनेक सेंटर कसे झाले? राज्यभरातले व्यसनमुक्तीचे यादव सरांचे काम भारतभर कसे पोहोचले? आणि आज एक दोन हजार नाही तर तब्बल साठ हजारांहून अधिक लोकांना व्यसनमुक्त कसे केले, याचा इतिहास यादव सरांनी माझ्यासमोर ठेवला.

प्रचंड आत्मविश्वास, प्रत्येकाचे चांगले करायची भावना आणि माझा जन्म देण्यासाठीच झाला आहे, ही उदात्त भावना यातून यादव सरांचे काम कुठलीही प्रसिध्दी न करता देशाच्या कानाकोपऱ्यांत पोहचले आहे.



डॉ. विजयकुमार यादव (9372346476) उच्चशिक्षित, मोठ्या घरात जन्मलेले, एका शिक्षकाचे सुपुत्र. तरुण वयामध्ये आजूबाजूला असलेली व्यसनाधीन मंडळी यामुळे व्यथित होऊन मी आयुष्यभर लोकांना व्यसनांतून बाहेर काढेन, या निर्धाराने पेटून उठलेले यादव सर यांनी १९९९ला लातूरमध्ये जीवनरेखा प्रतिष्ठान नावाची एक संस्था सुरू केली.

या संस्थेच्या माध्यमातून जीवनरेखा व्यसनमुक्ती केंद्र, एकात्मिक व्यसनाधीनता पुनर्वसन केंद्र आणि व्यसनमुक्तीचे पुनर्वसन केंद्र असे दोन सेंटर लातूरमध्ये सुरू केले. पैसे मिळोत वा न मिळोत, व्यसनग्रस्त माणसाला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावले.

जसंजसं काम वाढत गेलं, तशी काही अंशी शासनाची मदतही मिळू लागली. पण शासनाच्या तुटपुंज्या मदतीवर काही भागेना. स्वतःच्या जवळचे जे काही होते ते सरांनी अनेक वेळा विकायला काढले, पण सेंटरच्या माध्यमातून चालत असलेले काम काही थांबू दिले नाही.

दारू, गांजा आणि वेगवेगळ्या रसायनांचे सेवन करून त्याच्या आहारी गेलेले, पेट्रोलचा वास घेणारे, व्हाइटनरपासून ते चपल पॉलिश करण्याच्या क्रीमला व्यसनाचे साधन बनवणारे असे अनेक महाभाग त्या व्यसनमुक्ती सेंटरमध्ये होते. कोणी दारूच्या व्यसनापायी वडलांची होती नव्हती ती सगळी शेती विकली. कोणी दारूच्या व्यसनातून अनेक ठिकाणी चोरी केली. कुणाला दारूच्या व्यसनामुळे वेगवेगळे आजार झाले होते.

गांजाच्या व्यसनामुळे अनेकांचे आयुष्य बरबाद झाले होते. एक दोन नाही, हजार नाही, तर ६० हजार लोकांना व्यसनांच्या विळख्यातून यादव सर यांनी बाहेर काढले आहे. तिथं असणा ऱ्या प्रत्येक माणसावर स्वतंत्र चारशे पानांचा ग्रंथ होऊ शकेल, इतकं व्यसनांमुळे त्यांचे आयुष्य खंगून गेले होते.

प्रत्येकाची करूण कहाणी ऐकून असं वाटत होतं की, या जगात प्रचंड आनंद आहे, पण तुम्हाला जर एखादं व्यसन जडलं तर ते व्यसन कॅन्सरपेक्षाही खतरनाक असतं, हे तिथल्या प्रत्येक माणसाच्या पाणावलेल्या डोळ्यांतील आसवांना पाहून जाणवत होते.

यादव सर त्यांच्या कामात व्यग्र झाले. एक केंद्रात असलेली एक व्यक्ती संपूर्ण ट्रीटमेंट घेऊन घरी निघाली होती. त्या व्यक्तीला निरोप देण्यासाठी सोबतचे अनेकजण गेटपर्यंत आले होते. मी त्या माणसाला विचारले, 'काय झाले? तुम्ही कुठले? आता सुटले का व्यसन?

तो माणूस मला म्हणाला, मी राजीव रस्तोगी. मी ट्रक डायव्हर होतो. मित्रांच्या संगतीने दारूच्या व्यसनात बुडालो. शेवटी ज्या मित्रांची दारू यादव सर यांच्या सेंटरमुळे सुटली, त्याच मित्रांनी मला पैसे गोळा करून इकडे पाठवले. आज निर्व्यसनी बनून एक नवे आयुष्य मी सुरू केले आहे. कपाळावर टिळा आणि गळ्यात माळ हे सारे काही केंद्रात मिळणाऱ्या शिकवणीतून शक्य झाले.

माणूस कितीही श्रीमंत किंवा कितीही गरीब असो, तो एकदा व्यसनाच्या आहारी गेला की त्याच्या जगण्याला काहीही अर्थ उरत नाही. मला दोन मुली आहेत. त्या कधी मोठ्या झाल्या आणि कधी त्यांचे लग्न झाले, हे मला कळलेच नाही. दारूपायी आयुष्य कसे उध्वस्त झाले, हे समजलेच नाही, असे म्हणत राजीव रडत होते.

राजीव गेले. त्यांना पाठवताना त्यांचे सर्व मित्र भावुक झाले होते. मी यादव सर यांच्याकडे निघालो. यादव सर यांच्याकडे असताना एक व्यक्ती तिथल्या सर्वांना घेऊन समुपदेशनाचे धडे देत होती. त्याचे समुपदेशन ऐकत राहावे असेच होते. त्या सेंटरमध्ये औषधाशिवाय वाचन, चिंतन, मनन, कीर्तन, हे सारे काही होते. मी यादव सर यांच्याकडे गेलो. समुपदेशन करणारे सरही तिथे आले. त्या सरांची ओळख करून देताना यादव सर म्हणाले, 'हा माझा मुलगा कृष्णा यादव. सर्व कामं आता हाच पाहतो.

अजून एका मुलीला यादव सरांनी जवळ बोलावले. तिची ओळख करून देत ते म्हणाले, 'ही कान्होपात्रा नखाते. चंद्रपूरची आहे. पुण्याच्या दवाखान्यात अधिकारी आहे. आमच्याच नर्सिंग कॉलेजमध्ये शिकली आहे. नखाते यांच्यासारख्या १५० मुली दरवर्षी आमच्या कॉलेजमधून प्रशिक्षित होऊन पडतात. आम्ही जो सेवाभाव ठेवून काम उभे केले आहे, त्या कामाला ह्या सर्व मुली हातभार लावतात.

पाचवीच्या मुलांपासून ते ७५ वर्षांच्या व्यक्तीपर्यंत सर्वांच्या व्यसनाचे प्रकार खूप वेगवेगळे आहेत. अतिशय चिंताग्रस्त चेहरा करून यादव सर म्हणाले, 'एपीजे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्तेच्या दिशेने जाण्याचा कानमंत्र दिला खरा, पण प्रचंड प्रगती आणि सहजतेने, निष्काळजीपणाने आम्ही खूप गतीने मनोरुगणतेच्या दिशेने वाटचाल करतोय. अनेक ठिकाणी हेच चित्र आहे'. यादव सर खूप तळमळीने बोलत होते आणि मी खूप हतबल होऊन ऐकत होतो.

यादव सरांचे काम समजून घेताना रात्रीचे अकरा कधी वाजले, ते कळलेच नाही. यादव सरांचा निरोप घेऊन मी परतीच्या मागार्ला लागलो. यादव सर, त्यांचे वडील रघुनाथ यादव, सरांची आई भगीरथबाई आणि आता तिसरी पिढी, म्हणजे यादव सरांचा मुलगा कृष्णा यादव हे सर्व कुटुंबीय सुरू केलेले काम खूप नेटाने पुढे नेट आहेत. समाजात बदल घडवून आणण्यासाठी असे अनेक यादव परिवार आपल्या आसपास आहेत, ज्यांना तुमच्या आमच्या मदतीची गरज आहे, बरोबर ना?

■ ■ ■

# डीपसीकने भारतासाठी उघडली संधींची कवाडे!

डॉ. अमेय पांगारकर

डीपसीक हे चीनमध्ये २०२३ च्या मे महिन्यात स्थापन करण्यात आलेले एआय स्टार्टअप आहे. या कंपनीचे संस्थापक लियांग वेनफेंग यांनी २०२१ मध्ये एनव्हिडीयाच्या जीपीयूची खरेदी सुरू केल्याने एआय मॉडेल्सच्या विकासाला गती मिळाली.

डीपसीकची एआय मॉडेल्स अत्याधुनिक कार्यक्षमतेची, किफायतशीर आहेत. हे तंत्रज्ञान अवघ्या ५० कोटी रुपयांत विकसित झाले. त्यामुळे जागतिक एआय क्षेत्रात डीपसीकची प्रकर्षाने नोंद घेतली गेली. ओपन एआयचे सीईओ सॅम आल्टमन यांनी म्हटले होते की, चॅट जीपीटीसारखे प्रगत एआय साधन बनवणे कोणालाच सहज जमणार नाही. प्रत्यक्षात डीपसीकचे R1 मॉडेल लाँच झाल्यावर एनव्हिडीयासारख्या मोठ्या टेक कंपनीच्या शेअर्समध्ये २०% घसरण होऊन तिचे बाजारमूल्य सुमारे ६०० अब्ज डॉलरने घटले. परिणामी वैश्विक तंत्रज्ञान आणि गुंतवणूक क्षेत्रात अस्थिरता निर्माण झाली.

**दोन्हीकडून प्रचंड गुंतवणूक**

एआयच्या क्षेत्रातील वेगवान वाढ आणि नाविन्यामागे मोठ्या प्रमाणातील आर्थिक गुंतवणूक हे मुख्य कारण आहे. ओपन एआयला मायक्रोसॉफ्टकडून सुमारे १० अब्ज डॉलरचा वित्तपुरवठा झाल्याचे वृत्त आहे. या प्रचंड गुंतवणुकीमुळे ओपन एआयला डेटा सेंटर्सचा विस्तार, संशोधन आणि चॅट जीपीटीची कार्यक्षमता वाढवणे शक्य झाले. फेसबुकनेही आपल्या एआय विभागात अब्जावधी डॉलर गुंतवल्याची चर्चा आहे.

शेकडो संशोधक, अभियंत्यांच्या सहयोगाने त्यांनी LLAMA सारखी मोठी भाषिक मॉडेल विकसित केली आहेत. दुसरीकडे, डीप माइंड आणि गुगल एआय यांनी हातमिळवणी करून जेमिनीसारखी मॉडेल तयार करण्यासाठी अब्जावधी डॉलर गुंतवले आहेत. गुगलच्या विस्तृत सेवांची पार्श्वभूमी पाहता, उच्चस्तरीय डेटा सेंटर आणि अल्गोरिदम संशोधनावर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

डीपसीकह्ने या तुलनेत कमी संसाधने असूनही R1 हे अत्याधुनिक एआय मॉडेल विकसित केले. डीपसीकच्या गुंतवणुकीत सरकारी अनुदानांशिवाय खासगी गुंतवणुकीचा आणि आंतरराष्ट्रीय मदतीचाही समावेश होता.

**अमेरिका-चीन संघर्ष**

गेल्या काही वर्षांत एकीकडे तंत्रज्ञानाची भरारी सुरू असताना दुसरीकडे विविध देशांतील राजकीय आणि व्यापाराशी संबंधित संघर्षही वाढत होते. २०२२-२३ मध्ये अमेरिकेने चीनला अत्याधुनिक चिप्स आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर निर्बंध घातले. त्यामुळे चीनमधील हाय-टेक उद्योग आणि एआय क्षेत्रापुढे मोठे आव्हान उभे राहिले.

अमेरिकेच्या तत्कालीन बायडेन प्रशासनाचे म्हणणे होते की, चीनला चिप्सचा खुला पुरवठा होत राहिल्यास जागतिक सुरक्षेला धोका निर्माण होईल. या भूमिकेमुळे केवळ व्यापारी संबंधच नव्हे, तर तंत्रज्ञान-विकासावरही मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला.

**अल्प संसाधनांत मॉडेल विकसन**

अमेरिकेच्या या निबंर्धांचा फटका चीनमधील अनेक कंपन्यांना बसला. विशेषतः एआयमधील संशोधन, प्रशिक्षण आणि मॉडेल-विकासनासाठी उच्च-कार्यक्षमतेचे जीपीयू अत्यावश्यक असतात. एनव्हिडियासारख्या अमेरिकी कंपन्यांकडून होणारा चिप्सचा पुरवठा मर्यादित झाल्याने चीनमधील स्टार्टअप्ससमोर मोठी अडचण उभी राहिली.

अशा कठीण परिस्थितीत लियांग वेनफेंग यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या टीमने कमी जीपीयू संसाधने असतानाही अधिक परिणामकारक एआय मॉडेल तयार करण्यावर भर दिला. साधारणपणे जीपीयू आणि प्रचंड डेटावर अवलंबून राहणारे एआय संशोधन डीपसीकने अधिक कुशलतेने राबवले. प्रशिक्षणाची प्रक्रिया, अल्गोरिदम ऑप्टिमायझेशन आणि हार्डवेअरच्या उपयोगात नावीन्यपूर्ण पद्धती वापरल्या. अल्प संसाधनांतही गुणवत्तापूर्ण एआय मॉडेल विकसित करणे शक्य असल्याचे डीपसीकने दाखवून दिले.

**भारतासाठी नवी संधी**

भारतीय तंत्रज्ञान क्षेत्र जागतिक स्पर्धेत उतरत असताना, स्टार्टअप आणि इनोव्हेशन इको-सिस्टिमसाठी ही एक मोठी संधी ठरू शकते. भारतीय बँका, वित्त संस्था, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक उद्योगांमध्ये एआयवर आधारित स्वयंचलित सेवा आणखी बळकट होऊ शकतात.

डीपसीकसारखी साधने वापरून तांत्रिक संस्थांचे अभ्यासक्रम अधिक अद्ययावत आणि उपयोजनक्षम बनवता येतील. संशोधन संस्थांनाही एआयच्या संदर्भात नवे प्रयोग आणि प्रकल्प हाती घेता येतील, त्यातून एआय निष्णातांची नवी पिढी तयार होऊन या क्षेत्रात नव्या स्टार्टअप्सची लाट येऊ शकेल. एआय आधारित सेवांची गरज वाढून डेटा विश्लेषक, मशीन लर्निंग इंजिनिअर, प्रॉडक्ट डेव्हलपर आदी तांत्रिक कौशल्यांना मोठी मागणी निर्माण होईल.




**कडक धोरणे आवश्यक**

डीपसीकसारखी साधने मोठ्या प्रमाणात वापरली जातील, तशी भारतीय नियामक संस्थांनाही डेटा संरक्षण व गोपनीयतेबाबत अधिक कडक धोरणे आखावी लागतील. अत्याधुनिक नियम, मानकांची अंमलबजावणी करावी लागेल, जेणेकरून तंत्रज्ञानाचा योग्य वापर सुनिश्चित करता येईल. जागतिक बाजारपेठेत भारतीय प्रतिभेची चमक दाखवण्यात किफायतशीर एआय साधने महत्त्वाची भूमिका बजावतील. योग्य नियमन, सुरक्षा आणि नैतिक मूल्यांचा आदर राखून, भारतही एआयमधील संभाव्य शक्ती म्हणून उदयाला येऊ शकतो. ■ ■ ■

## ➤ महत्त्वाचे

### संजय जगताप यांनी रांगोळीतून साकारले भारतरत्न डॉ. आंबेडकर

**नाशिक ।** कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय गंगापूर रोड नाशिक येथील कलाशिक्षक संजय जगताप यांनी महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ फूट बाय ६ फुट



अशा सप्तरंगी रांगोळीच्या चित्रातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना साकारले. सुमारे चार ते पाच तासाच्या अथक परिश्रमातून बाबासाहेबांवर असलेली निष्ठा आणि नितीन श्रद्धेपोटी कलाशिक्षक श्री संजय जगताप यांनी भव्य अशी रांगोळी साकारलेली आहे आणि या रांगोळीच्या माध्यमातून त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिलेली आहे. विद्यार्थ्यांना देशासाठी केलेल्या महापुरुषांच्या अनोख्या कार्याची माहिती होणे आणि त्यांना देखील या चित्रातून कलेची आवड निर्माण व्हावी या उदात्त हेतूने हे रांगोळी चित्र साकारले असल्याचे कलाशिक्षक जगताप म्हणाले. त्यांच्या या कलाविष्काराबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पवार, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुजाता शिंदे, पर्यवेक्षक धनंजय देवरे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

### पीडब्ल्यूडी...सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांवर निधी कपातीची कुऱ्हाड

**नाशिक ।** एसटी कर्मचाऱ्यांना पगारापोटी अर्धी रक्कम देण्यावरून शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे प्रताप सरनाईक आणि अर्थमंत्री अजित पवारयांच्यात चांगलीच खडाजंगी सुरू आहे. परिवहन मंत्री सरनाईक या संदर्भात जाहीर बोलले. त्यामुळे त्याची चर्चा झाली. मात्र अन्य बऱ्याचशा विभागांची यापेक्षाही वाईट कोंडी झाल्याचे चित्र आहे. वक्फ बिलाचा उल्लेख करत प्रणिती शिंदेंचा मोठा दावा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि आमदार निधीसह विविध कामे सुशिक्षित बेरोजगार असलेले अभियंते करतात. गेल्या दोन वर्षात केलेल्या या कामांची दिले सादर करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतचा निधी शासनाकडे मागितला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्थ खात्याने या विभागाला मोठा शॉक दिला आहे.

### गोरेवाडी दहाचाळ येथील मंदिरात हनुमान जन्मोत्सव

**एकलहरे ।** गोरेवाडी दहा-चाळ येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात, अनेक धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी साजरा झाला असल्याची माहिती विनोद टाक यांनी दिली. गोरेवाडी दहा चाळ मधील हनुमान मंदिर ४० वर्षांपूर्वीचे मंदिर असून, दरवर्षी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी तीन दिवस श्रीमदभागवत कथा झाली. हनुमान जन्मोत्सव सोहळा सकाळी ७ वाजता, रामरक्षा पठण व महिला मंडळाचे सकाळी ८ ते भजन झाले. पालखी सोहळा दुपारी ४ वाजता, विनोद टाक यांच्या हस्ते करण्यात आला. पावन हनुमान महाआरती सायंकाळी ५ वाजता, भक्तिगीतांचा कार्यक्रम सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत महाप्रसाद, सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत असे संपूर्ण दिवसभर कार्यक्रम पार पडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गायकवाड मळा परिसरातील नागरिक, मंडळ व युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# आगामी कुंभमेळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी सतर्कता बाळगावी






**नाशिक ।** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात भाविकांची अभूतपूर्व गर्दी होईल. तेव्हा आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सूक्ष्म नियोजन करणे अनिवार्य आहे. अकस्मात आगी लागणे, गर्दी अनियंत्रित होणे, सायबर गुन्ह्यांमध्ये फटका बसणे हे टाळण्यासाठी आतापासूनच योग्य दक्षता घेऊन सतर्कता बाळगली पाहिजे. सर्व स्तरांवर पूर्वतयारी केली पाहिजे. सिंहस्थ कुंभमेळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी सर्वांनी सतर्कता बाळगावी असे मार्गदर्शन ' इफसी २०२५' चर्चासत्रात मान्यवरांनी केले.

## 'इफसी २०२५' चर्चासत्रात मार्गदर्शन

२०२७ मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे. त्या औचित्याने शुक्रवारी विनामूल्य चर्चासत्र आयोजित करण्यात आले. फायर अँड सिक्युरिटी असोसिएशनतर्फे 'इफसी २०२५' हा महत्वपूर्ण उपक्रम काल ११ एप्रिल रोजी दुपारी २ ते रात्री ८ या वेळेत कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात झाला. नाशिक चॅप्टर अध्यक्ष हर्षद भामरे यांनी प्रास्ताविकात कुंभमेळ्याचे महत्त्व सांगून उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. कुंभमेळ्यात संघटनेतर्फे १०० स्वयंसेवक पुरविण्यात येतील असे त्यांनी नमूद केले. त्यासंदर्भात विविध कार्यशाळा व प्रशिक्षण शिबीरे सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले. सेक्रेटरी आनंद दीक्षित यांनी सर्व सहभागी मान्यवरांचे व उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, महापालिकेचे अग्निशमन विभाग प्रमुख संजय बैरागी, एमआयडीसीचे विभागीय अग्निसुरक्षा अधिकारी अतुल मंगलकर हे मान्यव व्यासपीठावर उपस्थित होते. 'कुंभमेळ्यातील गर्दी नियंत्रण व्यवस्थापन' याविषयी राजेश शिर्के यांनी मार्गदर्शन केले. विविध प्रसंगी घडलेल्या कथित गोंधळांचा संदर्भ देत त्यांनी सूक्ष्म नियोजन कसे करावे हे वक्त्यांनी नमूद केले. अफवांवर विश्वास ठेवू नये असा इशारा देण्यात आला. राहूल बजाज 'सायबर गुन्हे, धोके व हानी' यातील दाहकता स्पष्ट केली. तर निवृत्त मेजर प्रकाश कापडे 'एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा' याविषयी माहिती दिली. 'कुंभमेळ्यात महिला सुरक्षितता' या विषयावरील चर्चासत्रात डॉ. अश्विनी पेखळे, प्रा.शुभदा चाफेकर, आरजे सतरंगी ऋचा सहभागी झाल्या. त्यांनी विविध मुद्द्यांवर लक्ष वेधले. या विनामूल्य उपक्रमात शासकीय अधिकारी व कर्मचारी, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझाइनर, तज्ज्ञ अभियंते, उद्योजक, औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञ, सल्लागार, कंत्राटदार तसेच ज्यांना या विषयात रुची आहे अशा नाशिककरांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समिक्षा येवले व शिल्पा फाहे यांनी केले. आनंद दीक्षित यांनी आभार मानले.



## चांदवडला महात्मा फुले यांची जयंती साजरी

**चांदवड ।** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची 198 जयंती डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. निकम यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले याच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या हस्ते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार आर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रा. निकम व वाघ यांनी ज्योतिबा फुले यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी परिसरातील नागरिकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. यात महिला वर्गही सहभागी झाला होता.

# 'मविप्र'चा योगेश सोनवणे ठरला पहिला महाराष्ट्रीयन खेळाडू

## चीनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय माउंटन सायकलिंग स्पर्धेसाठी निवड






**नाशिक ।** घरात अठरा विसे दारिद्र्य.. आई-वडील शेतमजूर.. रहायला छोटीशी झोपडी.. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अंतापूर-ताहाराबाद येथील एका आदिवासी कुटुंबातील योगेश नामदेव सोनवणे या १७ वर्षीय विद्यार्थ्याने अत्यंत खडतर आणि आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या राष्ट्रीय माउंटन (बाइक) सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये ब्रांझ आणि सिल्वर अशी दोन्ही पदके मिळवून मविप्रच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

विशेष म्हणजे या स्पर्धेतील कामगिरीमुळे त्याची चीनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, तो आता भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. आंतरराष्ट्रीय माउंटन बाइक सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये १८ वर्षांच्या आतील मुलांच्या गटात निवड होणारा योगेश सोनवणे हा पहिला महाराष्ट्रीयन खेळाडू ठरला आहे. सायकल फेडरेशन ऑफ इंडिया आणि हरियाना सायकलिंग स्टेट असोसिएशन यांच्या वतीने मोरनी हिल्स (हरियाणा) येथे दि. २८ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान २१ व्या सिनियर, ज्युनियर आणि सब ज्युनियर राष्ट्रीय माउंटन (बाइक) सायकलिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १८ वर्षांच्या आतील वयोगटामध्ये योगेश सोनवणे या विद्यार्थ्याने अप्रतिम कामगिरी करीत क्रॉस कंट्रीमध्ये ब्रांझ आणि टीम रिलेमध्ये सिल्वर या दोन्ही पदकांवर आपले नाव कोरले. या स्पर्धेतील यशस्वी कामगिरीमुळे एशियन सायकलिंग फेडरेशनच्या वतीने दि. २३ ते २७ एप्रिल दरम्यान चीनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय आशियाई माउंटन (बाइक) सायकलिंग स्पर्धेसाठी योगेशची निवड झाली आहे. सोमवारी (दि.१४) तो चीनला रवाना होणार आहे. योगेशला मोठा भाऊ भरत सोनवणे, क्रीडाशिक्षक प्रशांत कुमावत, क्रीडाशिक्षक गणपत आहेर यांचे मार्गदर्शन लाभले असून, नितीन नागरे, तुकाराम नवले आदींकडून वेळोवेळी आर्थिक मदत झाली आहे.

### 'त्यांच्या' चाकांएवढी योगेशच्या सायकलची किंमत..!

हरियाणातील राष्ट्रीय स्पर्धेत गोल्डमेडल मिळविणाऱ्या स्पर्धकाची सायकल १५ लाखांची, सिल्व्हर मेडल मिळविणाऱ्या स्पर्धकाची ८ लाखांची तर ब्रान्झ मेडल मिळविणाऱ्या योगेश सोनवणेची सायकल २ लाखांची होती. त्या स्पर्धकांच्या सायकलच्या व्हिल्सची किंमतदेखील योगेशच्या सायकलपेक्षा जास्त होती. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी डोंगरांवरून राइड करताना सुरक्षेच्या दृष्टीने डबल पूल सस्पेन्शन असलेल्या अशा महागड्या सायकलींची आवश्यकता असते. मात्र परिस्थितीअभावी योगेशला नाइलाजाने जुन्याच सायकलवर आंतरराष्ट्रीय स्पर्धा पूर्ण करावी लागणार आहे.

> ताहाराबाद महाविद्यालयातील विद्यार्थी योगेश सोनवणे याने अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या नॅशनल माउंटन बाइक सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये मिळविलेले यश कौतुकास्पद आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून योगेशने मिळविलेले यश मविप्र संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. आजवर मविप्र संस्थेतून अशा अनेक खेळाडूंनी ऑलिम्पिकपर्यंत मजल मारलेली आहे. योगेशदेखील चीनमधील एशियन गेम्समध्ये गोल्डमेडल मिळवेल, असा मला विश्वास आहे.
>
> **- ॲड. नितीन ठाकरे, सरचिटणीस, मविप्र समाज, नाशिक.**

### मविप्रच्या ताहाराबाद कॉलेजचा विद्यार्थी

योगेश सोनवणे हा मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक संचलित ताहाराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२ वी कला शाखेत शिक्षण घेत आहे. नाशिक जिल्हा विनायक कार्य समिती, सटाणा संचलित अंतापूर येथील जनता विद्यालयात इयत्ता दहावीला असताना योगेशने प्रथमता राज्यस्तरीय स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेले आहे.

### धाकट्या भावासाठी सोडला गेम

योगेशचा थोरला भाऊ भरत सोनवणे यानेदेखील याच खेळामध्ये तीन वेळा राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये यश मिळविलेले आहे. परंतु घरच्या परिस्थितीमुळे भरतने स्वतःचा खेळ थांबवून योगेशसाठी कंबर कसली आहे. भरतने एका सायकल दुकानात अनेक महिने काम करून जमविलेले पैसे, लोकवर्गणी आणि कर्ज काढून योगेशसाठी २ लाखांची सायकल घेतली आहे. योगेशला सरावासाठी भरतने आपल्या अनुभवाच्या जोरावर गावातील डोंगर-दऱ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या अनुषंगाने ट्रॅकदेखील तयार केला आहे.


**SINNAR TALUKA VIBHAGIY SAHAKARI DUDH UTPADAK VA PRAKRIYA SANGH MARYADIT, SINNAR**

**OFF LINE OPEN TENDER NOTICE**

**REF. NO – SINNAR MILK UNION/SUPPY OF MACHINARY FOR 10 TON POWDER PLANT / 15 /2025-2026**

On behalf of the Sinnar Taluka Vibhagiy Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit ,Sinnar, the undersigned invites Off line Open Tender (In 2 Envelope systems) for the following works.

| Sr. No. | Scope of work– Civil Construction | Total Nos. | Estimated Tender Value (Rs. in Crore) | EMD (Rs.) Rs. in Lakhs | Tender from Fee (Rs.) Not Refundable |
|---|---|---|---|---|---|
| 1 | DESIGN, SUPPLY, ERECTION , INSTALLATION, TESTING AND COMMISSIONING OF 10 TPD SPRAY DRYER PLANT | 1 Job (Turn Key Basis) | 6.00 | 6.00. | 25,000.00 |

1. Complete bidding process will be offline in two envelope system. All the Notifications & detailed terms and conditions regarding this tender notice hereafter will be available at union address @ At- Harsule Tal-Sinnar Dist –Nashik from 13/04/2025 , 10.00 am to 24/04/2025 ,15.00 pm.
2. Tender Bids will be opened offline on 27/04/2025 at 14.00 Hrs in At Mauje Harsule Tal – Sinnar Dist – Nashik for Sinnar Taluka Vibhagiya Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit, Sinnar Tal – Sinnar, Dist- Nashik
3. At the time of opening of technical bid tenderers should submit originals of scanned documents submitted, for verification.
4. Tenderers should submitted scanned copies of documents in Technical Envelope as mentioned in terms and conditions.
5. Tenderers should fill the rates as he desire in Commercial Envelope.
6. Time and Date of opening the financial bids will be informed to the QUALIFIED BIDDER.
7. The Chairman and Director of milk union reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reason.

**Dairy Manager**

**Sinnar Taluka Vibhagiya Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit ,Sinnar**



**SINNAR TALUKA VIBHAGIY SAHAKARI DUDH UTPADAK VA PRAKRIYA SANGH MARYADIT, SINNAR**

**OFF LINE OPEN TENDER NOTICE**

**REF. NO – SINNAR MILK UNION/CONSTRUCTION OF POWDER PLANT /15/2025-2026**

On behalf of the Sinnar Taluka Vibhagiy Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit ,Sinnar, the undersigned invites Off line Open Tender (In 2 Envelope systems) for the following works.

| Sr. No. | Scope of work– Civil Construction | Total Nos. | Estimated Tender Value (Rs. in Crore) | EMD (Rs.) Rs. in Lakhs | Tender from Fee (Rs.) Not Refundable |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Powder Plant At Gat No-61/P At Mauje Harsule Tal – Sinnar Dist – Nashik for Sinnar Taluka Vibhagiya Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit, Sinnar Tal – Sinnar, Dist- Nashik | 1 Job (Turn Key Basis) | 11.00 | 11.00. | 25,000.00 |

1. Complete bidding process will be offline in two envelope system. All the Notifications & detailed terms and conditions regarding this tender notice hereafter will be available at union address @ At- Harsule Tal-Sinnar Dist –Nashik from 13/04/2025 , 10.00 am to 24/04/2025 ,15.00 pm.
2. Tender Bids will be opened offline on 27/04/2025 at 14.00 Hrs in At Mauje Harsule Tal – Sinnar Dist – Nashik for Sinnar Taluka Vibhagiya Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit, Sinnar Tal – Sinnar, Dist- Nashik
3. At the time of opening of technical bid tenderers should submit originals of scanned documents submitted, for verification.
4. Tenderers should submitted scanned copies of documents in Technical Envelope as mentioned in terms and conditions.
5. Tenderers should fill the rates as he desire in Commercial Envelope.
6. Time and Date of opening the financial bids will be informed to the QUALIFIED BIDDER.
7. The Chairman and Director of milk union reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reason.

**Dairy Manager**

**Sinnar Taluka Vibhagiya Sahakari Dudh Utpadak Va Prakriya Sangh Maryadit, Sinnar**

# वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचा मलेरियामुक्त भारतासाठी विशेष पुढाकार

## जागतिक मलेरिया दिनानिमित्त डॉ. अनुप अग्रवाल यांनी केले विशेष मार्गदर्शन



**नागपूर, १२ एप्रिल :** प्रत्येक वर्षी २५ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक मलेरिया दिन हा मलेरियाला समूळ नष्ट करण्यासाठी संपूर्ण जगाला एकत्र आणणारा आणि जनजागृती करण्याचा महत्त्वाचा उपक्रम म्हणून साजरा केला होता. २०२५ चा हा दिन मलेरियामुक्त जग या उद्देशाला केंद्रस्थानी ठेवत साजरा होत असताना, भारतासारख्या पूर्वी मलेरियाच्या सावटाखाली असलेल्या देशासाठी ही जबाबदारी अधिक मोठी ठरते, असे प्रतिपादन नागपूर येथील वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या इंटर्नल मेडिसिन आणि क्रिटिकल केयर विभागाचे विशेषज्ञ डॉ. अनुप अग्रवाल यांनी केले.

मलेरियाची सर्वंकष माहिती देत असताना डॉ. अनुप अग्रवाल यांनी सांगितले की, प्लॅस्मोडियम नावाच्या पॅरासाईट्स मुळे मलेरियाचा आजार होतो. या पॅरासाईट्सने संक्रमित झालेल्या ॲनोफिलीस डासांमुळे तो मानवामध्ये पसरतो. २०२३ मध्ये भारतात संपूर्ण दक्षिण आशियातील सुमारे ६६% मलेरिया रुग्ण नोंदवले गेले होते. मात्र, राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन आराखडा (एनएफएमई) आणि दीर्घकाळ-टिकणाऱ्या आणि कीटकनाशकांना रोखणाऱ्या मच्छरदाणीचा वापर अशा शासकीय उपाययोजनांमुळे भारताने या लढ्यात मोठी प्रगती केली आहे, असेही ते म्हणाले.

वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या वतीने मलेरियावरील उपचारसंबंधी मार्गदर्शन करताना त्यांनी वैज्ञानिक संशोधन आधारित औषधांची व लसींची माहिती सामायिक केली. जलद निदान चाचण्या, प्रभावी औषधे (एसीटी आर्टेमीसिनिन आधारित कॉम्बिनेशन थेरपी) आणि आरटीएस,एस (मॉस्क्युरिक्स) सारख्या लसींचा विकास झाला असून या लसी मलेरियालावरील प्रभावी उपचार असल्याचे ते म्हणाले.

मलेरिया रोखण्यासाठी केवळ औषधोपचार पुरेसे नाहीत. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने ही आपली जबाबदारी समजून या मलेरियामुक्त भारताच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या वतीने करण्यात आले. आज मलेरियाच्या प्रतिबंधासाठी जागरूकता वाढवणे, स्वच्छता राखणे आणि वेळेवर उपचार घेणे खूप गरजेचे असल्याचे प्रतिपादन वोक्हार्ट हॉस्पिटल्स प्रशासनाने केले.

वोक्हार्ट हॉस्पिटलने मलेरियामुक्त भारतासाठी पुढील प्रतिबंधात्मक उपाय करण्याचे आवाहन समाजाला केले आहे.

* जनजागृती करा: सोशल मीडियाद्वारे, शाळांमध्ये किंवा स्थानिक कार्यक्रमांमध्ये ताप, घाम येणे यासारखी लक्षणे आणि त्यांच्या प्रतिबंधक उपायांची माहिती द्या.
* डासांची उत्पत्ती थांबवा: घराभोवती किंवा सार्वजनिक ठिकाणी साचलेले पाणी काढून टाका. डास अंडी घालतात अशा जागांवर लक्ष ठेवा आणि त्या जागांचा नायनाट करा.
* प्रतिबंधात्मक उपायांचा प्रचार करा: डासांपासून बचाव करणारी जाळी, मॉस्क्युटो रिपेलंटचा वापर करा आणि फुलबाहीचे कपडे वापरण्याचा सल्ला द्या, विशेषतः मलेरिया प्रभावीत भागात हे उपाय आवर्जून करा.
* चाचणी आणि उपचाराला प्रोत्साहन द्या: लवकर निदान आणि उपचारासाठी लोकांना प्रेरित करा. स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करा आणि आरोग्य मोहिमांमध्ये सहभागी व्हा.
* स्वयंसेवक बना: शासकीय उपक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांमध्ये सहभागी व्हा किंवा असे उपक्रम स्वतः आयोजित करा.

२०१५ पासून भारताने मलेरियाचे रुग्ण ८०% पेक्षा अधिक प्रमाणात कमी केले आहेत, त्यामुळे मलेरियाचे निर्मूलन शक्य असल्याचे दिसून आले आहे. याच पार्श्वभूमीवर मलेरियामुक्त भारत घडविण्यासाठी आणि निरोगी आणि सशक्त भारताकडे वाटचाल करण्यासाठी सर्वांनी एकत्र येत जनजागृती व त्वरित उपचाराचा अवलंब करावा असे आवाहन डॉ. अनुप अग्रवाल यांनी वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर यांच्या वतीने केले.

# दिघोरी येथे महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी



**नागपूर, १२ एप्रिल :** सामाजिक क्रांतीचे जनक, भारतीय अस्पृश्यांसाठी, महिलांसाठी सर्वप्रथम शाळा सुरू करणारे, सत्यशोधक समाजाचे संस्थापक क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती श्री क्षत्रिय कोसरे माळी समाज विदर्भ नागपूर संस्थाच्या वतीने दि. ११ शुक्रवारी दिघोरी येथे साजरी करण्यात आली. कोसरे माळी संघटन, दिघोरी येथील प्लॉटवर आयोजित कार्यक्रमात वसंतराव सोनुले, पुरुषोत्तम मांदाडे, रामेश्वरजी मोहुर्ले, बाळकृष्णजी गुरनुले यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कृष्णाभाऊ महादुरे, रणजीतजी सोनुले, राजेंद्र ठाकरे, विजय निकुळे, तुळशीरामजी वाडगुरे, मनोहर चौधरी, सुनील गुरनुले, पंकज मोहुर्ले तसेच मायाताई वाढई, कौशल्याबाई चौधरी, आशाताई सोनुले आदी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# शाप की कट ? सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत लांडग्याच्या हल्ल्यामागचे सत्य लवकरच तेनालीला समजणार ?

**मुंबई, १२ एप्रिल :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) या प्रतिष्ठित दरबारी कवी आणि अत्यंत मुत्सद्दी रणनीतीकाराच्या सुरस कहाण्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे.

अलीकडच्या भागांमध्ये, तथाकथित शाप आणि लांडग्याच्या हल्ल्यांचा छडा लावण्यासाठी तेनाली रामा सल्ला देतो की, केलाडी राज्यात नवीन राजाचा राज्याभिषेक करण्यात यावा.

आगामी भागांमध्ये, या रहस्याच्या मुळाशी जाण्यासाठी रामा एक युक्ती योजतो. रामाच्या मनात अदोनी (धर्मेंद्र त्रिपाठी) आणि चौडप्पा राया (राजा चौधरी) राजाची बहीण वसुधा (प्रिया शिंदे) यांच्याविषयी संदेह असतो. कारण त्याला हे समजलेले असते की लांडग्यांना पकडण्यासाठीचे जे जाळे असते, ते माणसाच्या हाताने तोडलेले असते आणि ते जाळे या दोघांनीच दिलेले असते. या रहस्याला आणखी एक नाट्यमय वळण मिळते, जेव्हा राजा कृष्णदेवराय (आदित्य रेडिज) या प्रकरणाचा छडा लावण्यात तेनालीला मदत करण्यासाठी केलाडीमध्ये येतो. त्यांचा प्रयत्न चालू असताना बहामनी लोक त्यांच्यावर हल्ला करतात. या हल्ल्यानंतर एक धक्कादायक सत्य उघडकीस येते, ते असे की बहामनी लोकांना हा शाप वगैरे सगळे खोटे असल्याचे आधीच माहीत असते.

केलाडी साम्राज्य अस्थिर करून सत्ता हस्तगत करण्यासाठी त्यांनीच ही गोष्ट रचून घबराट आणि अस्थिरता उत्पन्न केलेली असते. खरा शत्रू उघडकीस आल्यानंतर रामा दुसऱ्या महत्त्वाच्या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रित करतो केलाडी दरबारातील कोण लोक बहामनींना आतली माहिती पुरवत होते? उशीर होण्याअगोदर तेनाली रामा गद्दारांचा मुखवटा ओरबाडून काढू शकेल का?

या मालिकेत तेनालीची मध्यवर्ती भूमिका साकारत असलेला कृष्ण भारद्वाज म्हणतो, या कथानकातून तेनालीची मुख्य ताकद दिसून येते आणि ती म्हणजे सत्य आणि न्यायाची कास न सोडता दहा पावले पुढचा विचार करणे. शापित सिंहासनाच्या रहस्यामधून मला रामाचा मुत्सद्दी स्वभाव आणि त्याच्या सखोल भावनांचा शोध घेता आला. विशेषतः जेव्हा मित्र आणि शत्रू यांच्यातील सीमारेषा धूसर होऊ लागलेल्या असताना. तेनालीचा हा पैलू जिवंत करणे रोमांचक होते. तेनाली आपल्या खास ढंगाने प्रकरणाचा छडा कसा लावतो, हे प्रेक्षकांनाही बघायला नक्की आवडेल.

# सॅमसंगकडून भारतात ओडीसी गेमिंग मॉनिटर्स, फर्स्ट–एव्हर ग्लासेस–फ्री ३डी व ४के २४० हर्टझ ओएलईडी लाँच

**गुरूग्राम, १२ एप्रिल :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज ओडीसी गेमिंग मॉनिटर्सच्या २०२५ लाइन-अपच्या उपलब्धतेची घोषणा केली, ज्यामध्ये क्रांतिकारी ग्लासेस-फ्री ओडीसी ३डी, इंडस्ट्री-फर्स्ट ४के २४० हर्टझ ओडीसी ओएलईडी जी८ आणि अल्ट्रा-इमर्सिव्ह कर्व्ह ओडीसी जी९ आहे.

इमर्शन व कार्यक्षमता वाढवण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे मॉनिटर्स उच्च दर्जाच्या व्हिज्युअल फिडेलिटीची मागणी करणारे गेमर्स, कन्टेन्ट क्रिएटर्स आणि प्रोफेशनल्सच्या गरजांची पूर्तता करतात. नवीन ३७ इंच ओडीसी ३डी (जी९०एक्सएफ मॉडेल) त्याच्या उल्लेखनीय ग्लासेस-फ्री ३डी गेमिंग अनुभवासाठी भारतातील बाजारपेठेसाठी गेम-चेंजर आहे.

२७ इंच व ३२ इंच आकारांमध्ये उपलब्ध असलेले ओडीसी ओएलईडी जी८ (जी८१एसएफ मॉडेल) २४० हर्टझ रिफ्रेश रेट असलेला जगातील पहिला ४के ओएलईडी मॉनिटर म्हणून नवीन उद्योग मापदंड स्थापित करते. ओडीसी जी९ (जी९१एफ) ४९ इंच ड्युअल क्यूएचडी डिस्प्ले आणि १००० आर कर्व्ह स्क्रिनसह अद्वितीय अल्ट्रा-वाइड अनुभव देतो, विशेषत: ३२:९ किंवा २१:९ गेम्स खेळताना हाय-क्वॉलिटी व्हिज्युअल्स देतो.

''सॅमसंगमध्ये आम्ही अत्याधुनिक डिस्प्ले तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याप्रती, भारतातील ग्राहकांना जागतिक दर्जाचे इनोव्हेशन उपलब्ध करून देण्याप्रती कटिबद्ध आहोत. नाविन्यपूर्ण ओडीसी ३डी, ओडीसी ओएलईडी जी८ आणि ओडीसी जी९ मॉनिटर्सच्या लाँचसह आम्ही भारतात जगभरातील पहिले इनोव्हेशन्स आणण्यासोबत गेमर्सच्या इर्मशन, स्पीड व व्हिज्युअल एक्सलन्सचा अनुभव घेण्याच्या पद्धतीमध्ये उत्साहाची देखील भर करत आहोत,'' असे सॅमसंग इंडियाच्या एंटरप्राइज बिझनेसचे उपाध्यक्ष पुनीत सेठी म्हणाले.



ओडीसी ३डी : भारतातील पहिला ग्लासेस-फ्री ३डी गेमिंग मॉनिटर

प्रगत आय-ट्रॅकिंग तंत्रज्ञान आणि व्ह्यू मॅपिंग अल्गोरिदम्स असलेला हा मॉनिटर हाय-डेफिनिशन, आकर्षक ३डी व्हिज्युअल्स देतो, ज्यामुळे गेम्स व व्हिडिओ कन्टेन्ट अधिक वास्तविक वाटतात. रिॲलिटी हब ॲप व्हिडिओ कन्टेन्टला ओळखतो आणि ३डी मध्ये सादर करण्यासाठी पर्याय देतो.

सॅमसंग या नेक्स्ट-जनरेशन ३डी तंत्रज्ञानाला ऑप्टिमाइज करण्यासाठी नेक्सॉन फॉर द फर्स्ट बर्सेरकर. खजान यांसारख्या प्रमुख जागतिक गेम डेव्हलपर्ससोबत सहयोग करत आहे.

गेमिंग व्यतिरिक्त, ओडीसी ३डी मध्ये एआय-पॉवर्ड व्हिडिओ कन्वर्जन आहे, जे स्टॅण्डर्ड कन्टेन्टला ३डीमध्ये बदलते, जेथे जवळपास सर्व कन्टेन्टमध्ये नवीन ऊर्जेची भर करते. १६५ हर्टझ रिफ्रेश रेट, १ एमएस रिस्पॉन्स टाइम, एएमडी फ्रीसिंक सपोर्टसह ओडीसी ३डी सुलभ, विनाव्यत्यय गेमप्लेची खात्री देते. स्पॅटियल ऑडिओ (बिल्ट-इन स्पीकर्स) आणि एज लायटिंग वैशिष्ट्य गेमिंग अनुभवामध्ये अधिक उत्साहाची भर करतात, ज्यामुळे वास्तविकत: गेम खेळत असल्यासारखे वाटते.

ओडीसी ओएलईडी जी८: इंडस्ट्री-फर्स्ट ४के २४० हर्टझ ओएलईडी गेमिंग मॉनिटर

क्वॉन्टम डॉट तंत्रज्ञानाची शक्ती असलेला ओडीसी ओएलईडी जी८ सुधारित कलर्स, सखोल कॉन्ट्रास्ट व उच्च दर्जाचे व्युइंग अँगल्स देतो. वेसा डिस्प्लेएचडीआर ट्रूब्लॅक ४०० सर्टिफिकेशन निअर-इन्फानाइट कॉन्ट्रास्टची खात्री देते, ज्यामुळे २५० नीट्सच्या विशिष्ट ब्राइटनेस लेव्हल्समध्ये देखील विविध कलर्स पॉप अप होतात. सॅमसंगचे प्रोप्रायटरी ओएलईडी सेफगार्ड+ आणि डायनॅमिक कूलिंग सिस्टम स्क्रिनचा टिकाऊपणा वाढवतात, जे स्क्रिन तापमान कमी करत पहिल्यांदाच मॉनिटरमध्ये पल्सेटिंग हीट पाइप अप्लाय करत बर्न-इनला प्रतिबंध करतात.

अंडरराइटर्स लॅबोरेटरीज (यूएल)द्वारे प्रमाणित ग्लेअर-फ्री तंत्रज्ञान विनाव्यत्यय गेमिंगसाठी स्क्रिनला ५६ टक्के कमी ग्लॉसी बनवते. २४० हर्टझ रिफ्रेश रेट आणि ०.०३ एमएस रिस्पॉन्स टाइमसह ओडीसी ओएलईडी जी८ स्मूदर व्युइंग अनुभवाची खात्री देते, जेथे लॅग टाइम व मोशन ब्लर कमी करत अल्ट्रा-स्मूद ॲक्शनसह गेम-प्लेला उत्साहित करते.

ओडीसी ओएलईडी जी८ त्याच्या स्लिम मेटल बॉडी, कोअर लायटिंग+ आणि एर्गोनॉमिक स्टॅण्डसह कोणत्याही गेमिंग स्टेशनला अपग्रेड करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे.

ओडीसी जी९: अल्ट्रावाइड गेमिंग रिवॉल्यूशनचा विस्तार

वेसा डिस्प्लेएचडीआर ६०० आणि एचडीआर१०+ गेमिंगसह प्रमाणित ओडीसी जी९ वैविध्यपूर्ण, डायनॅमिक व्हिज्युअल्ससाठी ब्राइटनेस, कॉन्ट्रास्ट आणि कलर रेंज वाढवतो.

१४४ हर्टझ रिफ्रेश रेट, १ एमएस रिस्पॉन्स टाइम आणि एएमडी फ्रीसिंक प्रीमियमसह ओडीसी जी९ टीअरिंग व स्टटरिंगपासून मुक्त विनासायास गेमप्लेची खात्री देतो.

फक्त एवढेच नाही, पिक्चर-बाय-पिक्चर आणि पिक्चर-इन-पिक्चर मोड्ससह मल्टीटास्किंग अधिक प्रभावी करण्यात आले आहे, ज्यामुळे वापरकर्ते एकाच वेळी विविध सोर्सेसवर कन्टेन्ट पाहू शकतात. ऑटो सोर्स स्विच+ वैशिष्ट्य कनेक्टेड डिवाईसेसना ओळखत व डिस्प्ले करत अनुभवाला अधिक उत्साहित करते.

# कारचालकासह कंत्राटदारावर गुन्हा

## * अपघातानंतर मजुराला रस्त्यावर फेकल्याचे प्रकरण

**नागपूर, १२ एप्रिल :** अपघातानंतर जखमी मजुराला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्याचे सोडून रस्त्यावर फेकणारा कारचालक आणि मजुराच्या कंत्राटदाराविरुद्ध हिंगणा पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. कृष्णा तुलसीदास भुरसे (४५) रा. उदयनगर, असे मृताचे नाव आहे. कृष्णा घराजवळच राहणारा कंत्राटदार रुपेश शालिकराम वाकले (३२) याच्याकडे काम करीत होता. गत ३० मार्चच्या रात्री कामावरून घरी जात असताना रुपेशने गुमगाव परिसरात निष्काळजीपणे वाहन चालवून अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे कृष्णा दुचाकीवरून उसळत रस्त्यावर जाऊन पडला. सावरण्यापूर्वीच भरधाव आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारच्या चालकाने त्याला चिरडले. अपघातानंतर कार चालकाने वाहन थांबविले. मदतीचा विश्वास देऊन कृष्णाला रुग्णालयात नेण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवले. मात्र रुग्णालयात पोहोचविण्याऐवजी जुना चिंचभवन पुलाजवळील सर्व्हीस रोडवर जखमी अवस्थेत सोडून पसार झाला. हिंगणा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान रुपेश आणि कार चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी कार चालकाविरुद्ध पुरावा नष्ट करण्याचा गुन्हाही नोंदविला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजच्या माध्यमातून त्याचा शोध सुरू आहे.

# पुष्पा इम्पॉसिबलमध्ये चाळीच्या अस्तित्वाचा प्रश्न समोर उभा असतानाच पुष्पाला राशी आणि अर्जुन यांच्यातील जवळीक लक्षात येणार का

**मुंबई, १२ एप्रिल :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिका पुष्पा (करुणा पांडे) या व्यक्तिरेखेभोवती गुंफलेल्या हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायक कथानकाद्वारे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेते. या मालिकेत पुष्पाचा प्रवास सुंदर पद्धतीने मांडला आहे. जीवनातील आव्हानांचा ती ज्या हिंमतीने आणि सकारात्मकतेने सामना करते ते पाहताना प्रेक्षक अचंबित होतात. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांना राशी (देशना दुगड) आणि अर्जुन शेखावत (तन्मय नागर) यांच्यातील वाढती जवळीक लक्षात आली आहे. यामुळे कथानकात एक भावनिक पदर जोडला गेला आहे. दरम्यान, बापोद्रा (जयेश भारभाया) आणि पुष्पा तणावाखाली आहेत, कारण बापोद्रा चाळीवरील भाडेपट्टा आता लवकरच समाप्त होणार आहे आणि ती मालमत्ता विकली जाणार आहे.

आगामी भागांमध्ये अर्जुनचे वडील गुप्तपणे बापोद्रा चाळ विकत घेण्याचे ठरवतात. अनिश्चिततेने गोंधळून गेलेली पुष्पा आणि बापोद्रा श्री. शेखावत यांच्या ऑफिसमध्ये चाळीच्या भवितव्याविषयी चर्चा करण्यासाठी जातात. त्याच वेळी राशी देखील अर्जुनला भेटायला, त्याच इमारतीत जाते. शेखावत पुष्पा आणि बापोद्राचा अपमान करतात, त्यामुळे त्या दोघांना आपल्या चाळकरींच्या भवितव्याची चिंता लागून राहते. पुष्पा राशी आणि अर्जुनला एकत्र बघेल का? पुढे वाढून ठेवलेल्या गोंधळाला तिचा काय प्रतिसाद असेल?

पुष्पाची भूमिका करत असलेली करुणा पांडे म्हणते, पुष्पा अशी स्त्री आहे, जी नेहमी स्वतःच्या आधी इतरांचा विचार करते. पण यावेळी, मामला व्यक्तिगत आहे. दुसरीकडे, ती चाळीच्या अस्तित्वासाठी देखील झुंजत आहे, कारण अनेक कुटुंबांची स्वप्ने या जागेशी निगडीत आहेत.

आणि याच लढ्याशी संबंधित एका व्यक्तीमध्ये तिची मुलगी मनाने गुंतत चालली आहे. एक आई म्हणून तिला क्लेश होणे स्वाभाविक आहे. राशीने तिचा मार्ग स्वतः निवडावा असे जरी मला वाटत असले तरी ती त्यात दुखावली जाईल ही भीती देखील माझ्या मनात आहे. पुष्पाचे मन विदीर्ण झाले आहे. तिच्या साठी भावनिक दृष्ट्या हा एक मोठा आव्हानात्मक टप्पा आहे.

# एका मुलाचे धाडस: सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत हनुमान करुणेचा कैवार घेतो

**मुंबई, १२ एप्रिल :** सोनी सबवरील वीर हनुमान ही भव्य मालिका हनुमानाची प्रेरणादायक कथा वेगळ्या पद्धतीने सादर करून प्रेक्षकांची पसंती मिळवत आहे. बाल मारुतीपासून महाबली आणि पूजनीय हनुमान होईपर्यंतचा हनुमानाचा प्रवास या मालिकेत उलगडणार आहे. या मालिकेत बाल मारुतीची भूमिका आन तिवारी या बालकलाकाराने केली आहे. अभिनेता अरव चौधरी केसरीच्या सायली साळुंखे अंजनीच्या आणि माहिर पांधी वाली आणि सुग्रीव अशा दुहेरी भूमिकांमध्ये दिसत आहेत. वीर हनुमान मालिका दर सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता प्रसारित होत असून प्रेक्षकांसमोर भक्ती आणि नाट्य यांचे मिश्रण या मालिकेतून सादर होते. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, मारुतीला देवांकडून कशी वेगवेगळी वरदाने मिळाली आणि आता मारुती आपल्या या असामान्य ताकदीचा शोध घेऊ लागला आहे.

आगामी भागांमध्ये, कथानकाला एक नाट्यात्मक वळण मिळालेले दिसेल. आपल्या सिद्धींवर प्रभुत्व मिळवण्याच्या मारुतीच्या प्रवासात वाली विघ्न आणण्याचा प्रयत्न करतो. वाली केसरी आणि मारुती या दोघांना सहलीसाठी बोलावतो आणि मारुतीवर एक मोठ्या बैलाकरवी हल्ला करवण्याचे कारस्थान रचतो. पण, एक ऋषी त्या बैलाला शांत करण्याचा प्रयत्न करतात, पण शेवटी वाली ठरवतो की, या बैलाला मारावेच लागेल आणि हे काम तो केसरीला सोपवतो. ज्यावेळी बैलाला मारण्याची वेळ येते, तेव्हा मारुती सुजाणता आणि सहानुभूती व्यक्त करून बैलाला मारू नये अशी आपल्या पित्याला विनवणी करतो. तो युक्तिवाद करतो की, बैल त्याला होत असलेल्या वेदनेमुळे पिसाळला आहे त्यामुळे हिंसा हा त्याच्यावरचा उपाय नाही. हे ऐकल्यावर केसरी पेचात पडतो. त्याचे कर्तव्य आणि मुलाने कळकळून केलेली विनंती यांच्या कात्रीत तो सापडतो.

पित्याने दिलेला शब्द आपल्या मुलाच्या समंजसपणापेक्षा अधिक वजनदार ठरेल का? की, सहानुभूतीवरील मारुतीचा विश्वास केसरीचे हृदय परिवर्तन करेल? मालिकेत एक हृदयद्रावक क्षण उलगडताना बघा.

वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करत असलेला आरव चौधरी म्हणतो, एक पिता म्हणून, जेव्हा तुमचा मुलगा तुमच्या विरोधात उभा राहतो, तो क्षण फार कठीण असतो. पण पालकांच्या प्रवासातील तो महत्त्वाचा टप्पा असतो. मालिकेतील या दृश्यात, केसरीला एक कटू सत्य सामोरे आले आहे. त्याला हे समजून चुकले आहे की त्याचा मुलगा मारुती आपल्या विचारांवर ठाम आहे आणि त्यासाठी आपल्या वडिलांच्या विरोधात जाण्याची देखील त्याची तयारी आहे. हा भावनिक संघर्ष फार बोलका आहे कारण त्यातून हे प्रतिबिंबित होते की, जेव्हा तरुण पिढी स्वतंत्रपणे विचार करू लागते, तेव्हाच खरी वाढ होत असते. शिवाय या प्रसंगातून हे देखील दिसून येते की, मतभेद असले तरी प्रेम आणि आदर टिकून राहू शकतो.

## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदाऱ्या मिळू शकतात. अनावश्यक खर्च टाळा. विशेषत: चैनीच्या वस्तू खरेदी करणे टाळा, कारण त्यामुळे आर्थिक संतुलन बिघडू शकते. तुमचे मन अशांत राहू शकते.

**वृषभ :** आज परिस्थिती नियंत्रणात असेल. त्यामुळे चिंता मिटेल. आर्थिक लाभ होतील. नातेवाईकांना आर्थिक व्यवस्थापन करू देऊ नका. तुमचा जोडीदार तुमच्यावर कायम प्रेम करेल.

**मिथुन :** आज तुमच्या मित्रांचे सहकार्य लाभेल. व्यावसायिक जीवनात तुमची प्रगती होईल. तुमच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करा. तुमचे मन प्रसन्न राहील. आत्मविश्वास वाढेल.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी चांगली ओळख होईल. लोकांबरोबर बोलण्यात वेळ वाया घालवू नका. आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या प्रेमात खूप आनंद मिळेल. मित्राकडून धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** आज तुम्हाला एखाद्या महत्त्वाच्या कामात यश मिळू शकते. व्यावसायिक आणि वैयक्तिक दोन्ही स्तरांवर तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल. तुमच्या प्रयत्नांवर विश्वास ठेवा, कारण त्यामुळे तुम्ही यशस्वी व्हाल.

**कन्या :** अनपेक्षित चांगली बातमी मिळू शकते. कामाच्या ठिकाणी होणारे बदल विचारपूर्वक स्वीकारा. तुमचे आरोग्य उत्तम राहील. आर्थिक बाजूही चांगली राहील. नोकरीत अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**तुळ :** मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कामांमध्ये आवड निर्माण होईल. अचानक एखादा मित्र घरी येऊ शकतो. आज अचानक तुम्हाला भेटवस्तू मिळतील. नोकरीत प्रगतीचे मार्ग खुले होतील.

**वृश्चिक :** व्यवसायात थोडी मंदी वाटेल. पण धनलाभ होईल. कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घ्या. तुमच्या उत्पन्नात वाढ होईल. कुटुंबासोबत चांगला वेळ घालवण्यात तुम्ही यशस्वी व्हाल.


**धनु :** रागावर नियंत्रण ठेवा. शैक्षणिक बाबतीत सुधारणा होईल. नोकरीत प्रमोशन मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात बदल होऊ शकतो. आर्थिकदृष्ट्या दिवस सामान्य राहील. व्यावसायिक यश मिळेल.

**मकर :** प्रमोशनची संधी आहे. तुमच्या उत्पन्नात वाढ होईल. पण आरोग्याची काळजी घ्या. प्रवासात जवळचे मित्र-मैत्रिणी भेटू शकतात. खरेदीत जास्त खर्च करू नका. आज वैवाहिक जीवन खूप आनंदी राहील.

**कुंभ :** आज आरोग्यावर लक्ष देण्याची गरज आहे. कोणताही निर्णय भावनेच्या भरात घेऊ नका. स्वत:ला कामांमध्ये गुंतवा, ज्यामुळे तुमचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य सुधारेल.

**मीन :** ज्या भावनिक स्पष्टतेच्या शोधात आहेत, ती कदाचित तुम्हाला आज मिळेल. नात्यांच्या बाबतीत भावनिक होऊ नका. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी उच्च अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

# शब्दकोडे क्रमांक २०८३



**आडवे शब्द :-**

१) मत देण्याचे काम
४) कापडी नाडी
६) लाकूड
७) गगन
११) रुग्णालय
१३) सूट
१४) कडक
१५) वाळवी
१७) मोठे माकड
१९) श्रीकृष्णाच्या वडिलांचे नाव
२१) फळाचे साल
२४) मातीचा कण
२६) गार पाण्याचे मडके
२७) आणि
२८) मोठा नगारा, प्रसिद्धी, नौबत
२९) अभिप्राय
३१) स्वच्छंदी
३६) सोने
३८) करंजी, मोदकाचे आवरण
३९) वितरण
४१) पंजाबमधील एक नदी
४३) काटकसर
४६) बाण
४७) संगीतातील ठेका
४८) राजाचे निवासस्थान
५०) सरसकट
५३) हिस्सा
५४) प्रस्थान करणे
५६) केव्हा
५७) छाती
५९) सोन्याचा धागा
६०) सहाय्य
६१) किरकोळ सामान
६२) मध, गोड
६३) मोठी सुरी
६४) पवित्र
६६) लाकूड कापण्याचे हत्यार
६८) बसण्याची फळी
६९) जपजाप्य
७२) पूर्ण भेदून जाणारे
७४) नृत्य
७६) गणपतीचे एक नाव
७७) जन्म-मृत्यू

**उभे शब्द :-**

२) पूजा साहित्याचे ताट
३) यमनगरी
४) माकड (हिं) जहाजांचे स्थानक
५) औषध
६) अक्षरापुढील रेघ
७) आच्छादन
८) आजच्या आधीचा दिवस
९) चोविसावे नक्षत्र
१०) लवकर,
१२) जनगणना
१३) वर्ष, साल
१६) युद्ध
१७) व्यर्थ, निष्फळ
१८) आजच्या आधीचा दिवस
२०) फुला फलाचा फांदीला चिकटलेली छोटी दांडी
२२) दारूचा एक प्रकार
२३) ऐसपैस घातलेली मांडी
२५) पाणी
३०) कावळा
३२) सहस्त्र
३३) घळ
३४) दूर करणारा
३५) नसणारा, अनावश्यक
३७) नजर (अ.व.)
३८) पाप
४०) खग
४२) समशेर
४३) केव्हा (ग्रा)
४४) केव्हा(ग्रा )
४५) डाळीचे पीठ
४६) मंदवासर
४९) फाशी देणारा
५१) दारावरील खुणेचा आवाज
५२) प्रफुल्लित
५५) दारू, मद्य
५८) नष्ट होणारे
५९) वजनदार
६०) भ्रमर, भुंगा
६१) सपाट
६३) पुत्र
६५) पराजय
६७) निरर्थक घोषणा, बढाई
६८) पांडवांची संख्या केस,
७०) अत्युच्च, अतिशय
७१) वाचन
७२) वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद
७३) पारद
७४) श्वसनेंद्रिय
७५) अवधान, लक्ष, चित्त

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महाराष्ट्रातील शेतकरी हतबल

### जयंत पाटील यांची सरकारवर टीका



**मुंबई :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, कर्जबाजारीपणा, बोगस बियाणे आणि सरकारच्या असंवेदनशील धोरणांमुळे शेतकरी हतबल झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हरिदास बोंबले यांनी कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली, तर जालना जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला गव्हाचे बोगस बियाणे निघाल्याने उभे पीक रोटावेटरने नष्ट करावे लागले.

या घटनांवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका केली आहे. ह्लमहाराष्ट्रातील शेतकरी इतका हतबल कधीच नव्हता. ही काय परिस्थिती निर्माण केली आहे? असा संतप्त सवाल उपस्थित केला.

जयंत पाटील यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्यक्त केलेल्या मतात शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले, शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करताना शेतकऱ्याला महागाईची झळ बसते. जीएसटीचा भुर्दंड सहन करावा लागतो. खतांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. सत्ताधारी कर्जमाफीची मोठमोठी आश्वासने देतात, पण ती फक्त शब्दांची वाफ आहे, हे शेतकऱ्यांनी ओळखले आहे. सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस यांसारख्या नैसर्गिक आपत्तींनी शेतकरी आधीच पिचला आहे, त्यात सरकारच्या असंवेदनशील धोरणांनी त्याला पूर्णपणे हतबल बनवले आहे. एकीकडे श्रीमंत धनदांडग्यांसाठी सरकार खैरात वाटत आहे, तर दुसरीकडे १-२ लाखांच्या कर्जामुळे शेतकरी कुटुंबे आपला आधार गमावत आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. हरिदास बोंबले यांच्या कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर फौजदारी खटला दाखल करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

## राज्यातील वातावरण खराब



**मुंबई :** बेरोजगार तरुणांच्या हाती हत्यार देत रामनवमी आणि हनुमान जयंतीच्या मिरवणुकीत पाठवले जात आहे, हा कसला धर्म आहे. आपला उत्सव आहे तो आपल्या मंदिरासमोर साजरा केला पाहिजे, चर्च, मशिदीसमोर जात वातावरण खराब करण्याचे काही कारण नाही, असे कोणत्याचे देवाने सांगितले नाही, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, हे जे नवे नवे हिंदुत्वाचे मुल्ला तयार झाले आहेत, त्यांनी वातावरण बिघडवण्याचे काम सुरू केले आहे. हनुमान जयंती, रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. पण मुंबईत ज्या मिरवणुकी निघाल्या त्या विकृती होत्या असे राऊतांनी म्हटले आहे. येणाऱ्या पिढ्या आम्हाला कशा प्रकारे लक्षात ठेवतील.

राम नवमी असो किंवा हनुमान जयंती, या आपल्या परंपरा आहेत. वषार्नुवर्षे आपण राम नवमी साजरी करत आहोत, हनुमान जयंती साजरी करत आहोत. हे सण आपल्या श्रद्धेचा भाग आहेत, आपल्या आत्म्याचा भाग आहेत. पण आता काही लोक ज्या पद्धतीने हे सण साजरे करण्याचा प्रयत्न करत आहेत - ते प्रत्यक्षात गोष्टींमध्ये व्यत्यय आणत आहे. हे आपल्या सनातन धमार्साठी, हिंदू धमार्साठी चांगले नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

## भीषण आगीत चार दुकाने खाक

**अंजनगाव सुर्जी :** तालुक्यातील पांढरी येथे चार दुकाने भीषण आगीत जळून खाक झाली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. अंजनगाव सुर्जी ते परतवाडा मार्गावरील पांढरी येथील स्टँडवरील काही दुकानांना अचानक आग लागली.

या आगीत अमोल हाडोळे यांचे श्री माऊली कृषी सेवा केंद्र, गजानन निंबोकार तसेच सुधाकर निंबोकार या दोघांचे सलूनची दुकाने व सुनील अतकरे यांचे पानटपरीसह चहा कॅन्टीन जळून खाक झाले आहे. माऊली कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल हाडोळे यांनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. या आगीमुळे रासायनिक खते, बियाणे व इतर साहित्य व त्याचप्रमाणे सलूनच्या दुकानातील साहित्य, चहाच्या दुकानातील साहित्य जळून खाक झाल्याचे नागरिकांनी सांगितले. घटनेची माहिती अंजनगावचे तहसीलदार पुष्पा सोळंके यांना मिळताच तत्काळ अग्निशामक गाडी पांढरी येथे पाठवण्यात आल्याने आग तातडीने आटोक्यात आणण्यात आली. या दुकानांमध्ये सिलिंडरही होते. परंतु, सिलिंडरला आग लागली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

## नीतेश राणेंही एकदिवस जेलमध्ये

**मुंबई :** माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे एक दिवसच जेलमध्ये राहिले होते. पण नीतेश राणे यांचा तुरुंगातील मुक्का फार लांब असू शकतो, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. दरम्यान, बघू, तुरुंगात ते जातात की मी, असे म्हणत नीतेश राणे यांनी दानवे यांना आव्हान दिले आहे.

नीतेश राणे यांनी गुरुवारी सायंकाळी सिंधुदुर्गात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना महाविकास आघाडीच्या काळात नारायण राणेंना झालेल्या अटकेवर भाष्य केले होते. नीतेश राणे यांच्या या विधानाविषयी ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांना छेडले असता त्यांनी नीतेश राणे यांनाही नारायण राणेंसारखे एकदिवस तुरुंगात जावे लागेल, त्याची चिंता करू नका, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

# वेतन कपातीमुळे कर्मचाऱ्यांत संताप

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १२ :**



विभागीय कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांची निदर्शने

गेल्या काही दिवसापासुन आर्थीक मंदीची झळ सहन करत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाने मार्च महिन्याच्या पगारात तब्बल ४४ टक्के कपात करुन केवळ ५६ टक्के पगार कर्मचाऱ्यांच्या हाती टिकवला आहे.

यामुळे एसटीच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली असून शासनाच्या या निर्णयाविरुद्ध एसटी कर्मचाऱ्यांनी एकत्र येत विभागीय कार्यालयाच्या समोर आंदोलन केले. यावेळी नारेबाजी करीत निषेध नोंदवण्यात आला.

राज्य परिवहन महामंडळातील कामगारांनी कोरोना काळानंतर वेतनाकरिता संप पुकारला होता. बराच काळ चाललेल्या या संपानंतर न्यायालयाने कर्मचाऱ्यांचे वेतन महिन्याच्या ७ किंवा १० तारखेपर्यंत काढावे, असे आदेश दिले होते. असे असताना परिवहन महामंडळाच्या वतीने बऱ्याचदा वेतनासाठी विलंब करण्यात येतो. आता तर मार्च महिन्याचे कर्मचाऱ्यांचे वेतन देताना त्यामध्ये तब्बल ४४ टक्के वेतनाची कपात करुन केवळ ५६ टक्के पगार कर्मचाऱ्यांना दिला आहे.

यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये परिवहन विभागाच्या विरोधात नाराजीचा सूर उमटला आहे. अत्यल्प मनुष्यबळातील कर्मचारी काम करीत आहे. परंतु अर्धा पगार देण्याची नामुष्की परिवहन विभागाने केली. एसटीच्या आर्थिक परिस्थितीबाबत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी आणि उपदानाच्या तरतुदीस अनुसरून वेतनातून वसुली करण्यात आली होती. मूल्याचा परतावा हवा प्रवासी भाडेवाढ आणि विविध सवलतीमुळे राज्यातील जनतेला आवश्यक प्रवासी सेवा देण्यात मनुष्यबळ आणि वाहन संख्यांची कमतरता जाणवत आहे. सवलत मूल्याचा परतावा विहित कालमयार्दीत होत नाही. याची शिक्षा कर्मचारी भोगत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी निवेदनातून केला आहे. हे आंदोलन महाराष्ट्र एसटी कामगार सेनेच्या वतीने करण्यात आले.

तिकडे, अकोला येथेही एसटी कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेच्या वतीने नवीन बस स्थानक परिसरात आंदोलन करण्यात आले. कामगारांना मागिल महिन्याचे संपूर्ण वेतन देण्याची आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

## गळती रोखण्यासाठी ठाकरे मातोश्रीतून बाहेर पडणार

### १६ एप्रिलपासून सभांचा धडाका

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**



उद्धवसेनेत सध्या मोठ्या प्रमाणावर गळती सुरू आहे. अनेक स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि काही नेते शिंदेसेनेत प्रवेश करत असल्याने पक्षासाठी मोठी डोकेदुखी बनली आहे. ही गळती रोखण्यासाठी उद्धव ठाकरे आता राज्यव्यापी दौरा करणार आहेत. आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्वाचा मानला जात आहे.

या दौऱ्याची सुरूवात १६ एप्रिलला नाशिक येथून होणार असून, त्यानंतर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही जाहीर सभा व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचे ठाकरे यांचे नियोजन आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राज्यातील सभा आणि जाहीर कार्यक्रमांना सध्या चांगला प्रतिसाद मिळत आहेत.

यामुळे उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीच्या चौकटीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. विधानसभेला उद्धवसेनेला जबर फटका बसला. त्यानंतर दर आठवड्याला किमान चार ते पाच महत्त्वाचे कार्यकर्ते, पदाधिकारी शिंदेसेनेत जात आहेत. त्यांना रोखण्याचे आव्हान उद्धवांपुढे आहे.

काँग्रेसची साथ स्वीकारल्याने उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडले, असा आरोप केला जात आहे. तो पुसण्याचा प्रयत्न ते राज्यव्यापी दौऱ्यातून करणार आहेत. नाशिक हे हिंदुबहुल आणि धार्मिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. म्हणून तेथून उद्धव ठाकरे राज्यव्यापी दौऱ्याला सुरूवात करणार असल्याचे म्हटले जात आहे. उद्धवसेनेतील सूत्रांनी सांगितले की, इतर राज्यातील इतर प्रमुख शहरांच्या तुलनेत नाशिक शहरामध्ये उद्धवसेनेची संघटना मजबूत असल्याचा अहवाल उद्धव यांना नुकताच सादर करण्यात आला आहे. शिंदेसेना नाशिकमध्ये पाय रोवण्याच्या आधीच हल्लाबोल करण्याचा सल्लाही उद्धव यांना देण्यात आला आहे.

## टँकर संपावर तोडगा काढा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**



मुंबई वॉटर टँकर असोसिएशनच्या संपामुळे शहरातील काही भागांत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ऐन उन्हाळ्यात ही समस्या गंभीर बनत असल्याने सामान्य नागरिकांचा त्रास टाळण्यासाठी तातडीने तोडगा काढावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत. टँकरचालकांच्या मागण्या आणि नवीन नियम यांच्यात सुवर्णमध्य साधत ही परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे आदेश त्यांनी दिले.

मुंबईत सध्या जलाशयांमध्ये केवळ ३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर काही भागांत पाणीकपात सुरू आहे, आणि नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत टँकरचालकांनी नवीन नियमांच्या विरोधात पुकारलेल्या संपामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. या संपाचा फटका झोपडपट्ट्या, मॉल्स, हॉटेल्स, रुग्णालये, मेट्रो आणि इमारत बांधकामांना बसत आहे. विशेषतः गैरपेयजलाची गरज असलेल्या प्रकल्पांना याचा मोठा त्रास होत आहे.

मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नव्या नियमांना विरोध दर्शवत १० एप्रिलपासून बेमुदत संप सुरू केला आहे. या नियमांमध्ये प्रत्येक विहिरीभोवती २०० चौरस मीटर जागेची अट, फ्लो मीटर आणि जीपीएस ट्रॅकिंग यंत्रणा बसवण्याची सक्ती यांचा समावेश आहे. टँकरचालकांचे म्हणणे आहे की, मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात या अटींचे पालन करणे अव्यवहार्य आहे. यामुळे त्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या समस्येची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना टँकरचालकांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या आणि नियमांमधील त्रुटींवर तोडगा काढण्याचे निर्देश दिले. उन्हाळ्याच्या काळात पाणीटंचाईमुळे नागरिकांचा त्रास वाढता कामा नये. टँकरचालकांच्या मागण्यांचा विचार करत सामान्य जनतेला त्रास होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी २०२३ मध्येही टँकरचालकांनी असाच संप पुकारला होता, तेव्हा फडणवीस यांनी मध्यस्थी करून तो सोडवला होता. यंदाही त्यांनी तातडीने हस्तक्षेप करत महापालिकेला त्वरित पावले उचलण्यास सांगितले आहे. यामुळे लवकरच टँकरचालकांशी चर्चा होऊन हा संप मिटण्याची शक्यता आहे. तरीही, पाणीटंचाई आणि संपामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

## कृषिमंत्र्यांच्या घरासमोर प्रहारचे आंदोलन

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १२ :** राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करत सातबारा कोरा करावा, या मागणीसाठी प्रहार संघटनेच्यावतीने राज्याचे कृषीमंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे यांच्या निवासस्थानासमोर शुक्रवारी रात्री तासभर मशाल आंदोलन करण्यात आले.

यावेळी पोलिसांना कृषीमंत्री कुठे हे माहिती नाही, महाराष्ट्रात असे कधी होत नाही, मिसिंग मंत्री झाले आहेत, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला आहे. कडू म्हणाले की, आमचे आंदोलन थांबले असताना पोलिसांकडून चक्का जाम करण्यात येत आहे. हा गुन्हा पोलिसांवर दाखल झाला पाहिजे. आम्ही पुढे जाऊ नये म्हणून पोलिसांनी दोन ट्रक लावत महामार्ग अडवला.

निवडणूक काळात महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी कर्जमाफीचे आश्वासने दिले होते. सत्ता मिळाल्यानंतर संबंधितांना त्याचा विसर पडला. शेतकऱ्याला कर्जमाफीची आवश्यकता असल्याकडे लक्ष वेधण्यात आले. आम्ही कोकाटे यांना भेटायला जात असताना पोलिसांनी आम्हाला अडवण्याची भूमिका का घेतली माहिती नसल्याचे कडू म्हणाले.

# दीनानाथ रुग्णालयाने आमटेंकडूनही ५ लाख घेतले

### विजय वडेट्टीवारांची पुन्हा मंगेशकरांवर टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने प्रकाश आमटेंकडून ५ लाख रुपयांचे बिल घेतले होते. एवढेच नाही तर हे रुग्णालय धमार्दाय पद्धतीचे असूनही त्यातील ७ वा मजला हा पूर्णतः मंगेशकर कुटुंबीयांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. धर्मादाय रुग्णालय असूनही येथे तपासणीसाठी २० रुपयांऐवजी ६०० रुपये घेतले जातात, असे ते म्हणालेत.

विजय वडेट्टीवार शनिवारी पत्रकारांशी बोलताना मंगेशकर कुटुंबीयांचे वेगवेगळे किस्से सांगितले. ते म्हणाले, हे दीनानाथ हॉस्पिटल सत्ताधारी आमदारांच्या पीएकडून १० लाख रुपये घेतल्याशिवाय उपचार करू शकत नाही, तर गरिबांची सेवा करणारे रुग्णालय आहे का? हे चॅरिटी हॉस्पिटल आहे का? याचाही विचार विविध क्षेत्रातील मान्यवरांनी करावा. उगीच भावनेच्या भरात काहीतरी वाचवण्याचा व सपोर्ट करण्याचा प्रयत्न करू नये अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे. मी कुणावरही टीका करत नाही. मी केवळ वस्तुस्थिती मांडत आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, प्रकाश आमटे यांना कॅन्सर डिटेक्ट झाला त्यावेळी एका मध्यस्थीने दीनानाथ रुग्णालयाच्या प्रशासनाला उपचारासंबंधी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी आमटे यांना अ‍ॅडमिट होण्याचा सल्ला दिला. त्यांनी आम्ही प्रकाश आमटेंकडून एकही रुपया घेणार नाही, त्यांच्यावर मोफत उपचार करू अशी ग्वाहीही दिली. पण नंतर बाहेरून औषधी मागवण्याचे कारण सांगत आमटे यांच्या आप्तेष्टांकडून ५ लाख रुपये वसूल केले.



ते पुढे म्हणाले, परभणीला एक साहित्य संमेलन होते. नारायण सुर्वे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमात आशाताई भोसले यांच्या गायनाचा कार्यक्रम ठरवण्यात आला होता. तेथील तत्कालीन खासदारांचे नाव मला आठवत नाही. पण ते आशादीदींकडे गेले. त्यांनी त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. पण त्यांनी त्यांच्याकडे २ लाख रुपये देण्याची मागणी केली. नंतर कार्यक्रम जवळ आल्यानंतर त्यांनी पुन्हा ३ लाख रुपयांची मागणी केली. आयोजकांनी त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्या बधल्या नाहीत. पैसे मिळाल्याशिवाय मी येणार नाही असे त्या म्हणाल्या.

वडेट्टीवार यांनी यावेळी आणखी एका कार्यक्रमाचाही किस्सा सांगितला. ते म्हणाले, नागपूर कॉर्पोरेशनचा एक कार्यक्रम होता. त्यावेळी लतादीदींनी विदर्भ साहित्य संमेलनाच्या मंचावर मोफत गाण्याची तयारी दर्शवली होती. त्यामुळे आयोजकांनी कार्यक्रमाची तारीख ठरवून त्यांच्याशी संपर्क साधला. तिकडून निरोप आला की, आमची सोय पंचतारांकित हॉटेलमध्ये करा. आमच्या वाद्य संचाला तुम्हाला पैसे द्यावे लागतील. एवढेच नाही तर आमच्यासाठी विशेष विमानाचीही सोय करावी लागेल. त्यावर आयोजकांनी यासाठी किती खर्च येईल अशी विचारणा केली. त्यावर त्यांना २२ लाख लागतील असे सांगण्यात आले.

त्यांनी या रकमेचा चेक देण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी हृदयनाथ मंगेशकर यांनी हे पैसे चेकने नव्हे तर कॅशमध्ये मागितले, अशी आठवण वडेट्टीवार यांनी सांगितली.

## मोरेश्वरासह पाच गणपती मंदिरांत ड्रेसकोड

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :** अष्टविनायकांपैकी मोरेगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी व सिद्धटेकच्या सिद्धिविनायकासह इतर 2 गणपती मंदिरांसाठी चिंचवड देवस्थान ट्रस्टने वस्त्रसंहिता जारी केली आहे.

या संहितेनुसार, या गणपतींच्या दर्शनासाठी येणाऱ्या पुरुष भाविकांना सभ्य पोशाख परिधान करावा लागणार आहे. तर महिलांनाही पारंपरिक पोशाख किंवा मंदिराच्या पावित्र्यास अनुकूल असणारे आदरयुक्त वस्त्र परिधान करावे लागणार आहेत.

चिंचवड देवस्थान ट्रस्टकडे मोरेगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी व सिद्धटेकच्या सिद्धिविनायक या अष्टविनायकांपैकी 3 मंदिरांसह चिंचवडचा मोरया गोसावी संजीवन मंदिर व खार नारंगी मंदिराचे नियंत्रण आहे. त्यानुसार, या ट्रस्टने या पाचही गणपती मंदिरांसाठी वस्त्रसंहिता लागू केली आहे. ट्रस्टने ही नियमावली म्हणजे सक्ती नसून, मंदिराचे पावित्र्य राखण्याचे आवाहन केले आहे.

## १० हजाराची सुपारी देत दोघांचा खून

### जावई, मामा आणि भावाने रचला कट

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १२ :**

मेव्हण्याने विवाहीत महिलेशी लग्न केल्यास आपली समाजात बदनामी होईल म्हणून जावई, मामा आणि भावाने कट रचून जावयाने दोन मित्रांच्या मदतीने मेव्हण्यासह त्या विवाहीत महिलेची हत्या केल्याची कबुली पोलिसांसमोर दिली.

ही घटना दिग्रस तालुक्यातील ईसापूर शेत शिवारातील दत्तापूर गावाजवळील कोलुरा ते फेट्री मार्गावर ७ एप्रिलला उघडकीस आली होती. या प्रकरणातील चौघांना दिग्रस पोलिसांसह एलसीबी पथकाने ताब्यात घेतले आहे. याबाबतची माहिती पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली.

वर्षा धनराज गिरे (वय २६) वर्ष रा. उमरी बु. जि. वाशीम आणि आकाश विलास बल्लाळ (वय २५) वर्ष रा. गोस्ता रूई जि. वाशीम अशी मृतकांची नावे आहेत. तर विजय भारत शिकारे (वय २९) वर्ष, राजेश सोनबा गोदमले (वय ३४) वर्ष, धर्मराज तुकाराम बोडके (वय ३०) वर्ष सर्व रा. विठाळा ता. दिग्रस, विकास विलास बल्लाळ (वय २१) वर्ष रा. गोस्ता रूई जि. वाशीम अशी ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांची नावे असून विशाल शिकारे हा अद्याप फरार असून त्याच्या शोधात पथके रवाना करण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी रजनीकांत चिलुमुला, सतिश चवरे, सेवानंद वानखडे यांच्यासह एलसीबीतील अधिकारी यांनी पार पाडली.

आरोपींनी जवळच्या दोन मित्रांना खूनाची सुपारी देण्याबरोबरच दारुसाठी पैसेही पाठवले. घटनास्थळावर दोन्ही मित्रांना बोलावून त्यांच्या मदतीने प्रथम आकाश याच्यावर हल्ला चढवून त्याची हत्या केली. त्या ठिकाणाहून पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या वर्षा हीचा पाठलाग करीत तिचीही हत्या करण्यात आली. त्यानंतर हत्येचा मोबदला म्हणून राजेश गोदमले आणि धर्मराज बोडखे या दोघांना पाच हजार रुपये ऑनलाईन आणि पाच हजार रुपये रोख असे दहा हजार रुपए जावई विजय याने दिले होते.

दिग्रस तालुक्यातील फेटरी, साकरी वनविभागाच्या जंगल परिसरात ७ एप्रिलला अनोळखी तरूणासह महिलेचा मृतदेह आढळून आला होता. शवविच्छेदनानंतर त्या दोघांची हत्या झाल्याची बाब समोर आली. मात्र ते दोघे कुठले रहिवासी आहेत, याबाबत कोणालाही काही माहिती मिळत नव्हती.

मृतदेहाच्या वर्णनावरून मृतकांचे स्केच तयार करण्यात आले. त्याचबरोबर आजूबाजूच्या जिल्ह्यातील मिसींग महिला, पुरूषांचा शोध सुरू करण्यात आला. तसेच शोधपत्रिका प्रसारित करण्यात आली. अशात वाशीम जिल्ह्यातील उमरी येथील वर्षा गिरे ही महिला बेपत्ता असल्याचे निष्पन्न झाल्याने या प्रकरणाचा क्ल्यू पोलिसांना मिळाला.

तिचे संबंध असलेल्या व्यक्तीचाही शोध घेत असताना सदर ईसम बेपत्ता असल्याचे लक्षात आले. त्यातून, जवळच्या नातेवाईकांना ताब्यात घेवून विचारपूस करण्यात आली आणि दुहेरी हत्येचे रहस्य उलगडण्यात पोलिसांना यश आले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार?

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**



राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार आणि अजित पवार यांच्या गटांमध्ये २०२३ मध्ये फूट पडली असली, तरी दोन्ही गटांच्या एकत्र येण्याच्या चर्चांनी सध्या राजकीय वर्तुळात जोर धरला आहे.

दोन्ही गट एकाच विचारधारेवर चालत असल्याचे दिसते. शरद पवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने नेहमीच मानवतावादाला प्राधान्य देत, जातीपातीच्या पलीकडे जाऊन ऐक्याचा संदेश दिला. हाच विचार अजित पवार यांचा गटही पुढे नेत आहे. मग विचार आणि ध्येय एकच असताना हे दोन्ही गट किती काळ वेगळे राहू शकतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करताना शरद पवार यांनी जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवले. सामाजिक न्याय, शेतकरी आणि सर्वसामान्यांचे हित यांना प्राधान्य देणारी ही विचारधारा आजही दोन्ही गटांमध्ये दिसून येते. अजित पवार यांचा गट सत्तेत असला, तरी शरद पवार यांच्या गटानेही आपली सामाजिक बांधिलकी आणि जनतेच्या प्रश्नांवरील लढा कायम ठेवला आहे. राष्ट्रवादीचा झेंडा सत्तेत असो वा नसो, तो नेहमी फडकत राहिला आहे.

सत्तेशिवाय पक्ष टिकवणे आणि कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावणे कठीण असते, असे राजकीय वास्तव आहे. आगामी सहा वर्षे विधानसभा आणि लोकसभा निवडणुका नाहीत. अशा परिस्थितीत शरद पवार यांच्या गटातील कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे आव्हान पक्षश्रेष्ठींसमोर आहे. दुसरीकडे, अजित पवार यांचा गट सत्तेत असल्याने त्यांना कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे तुलनेने सोपे आहे. यामुळे दोन्ही गटांमध्ये एकत्र येण्याच्या शक्यतांवर विचार होत असल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादीच्या फुटीमुळे पक्षातच नव्हे, तर पवार कुटुंबातही दरी निर्माण झाल्याची चर्चा होती. मात्र, कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये शरद पवार आणि अजित पवार यांचे कुटुंब एकत्र दिसते. अजित पवार यांनी अनेकदा जाहीरपणे शरद पवार यांना आपले दैवत संबोधले आहे. शरद पवार यांच्या गटाविरोधात कोणतीही आक्रमक भूमिका घेण्यास अजित पवार गट धजावत नाही. याउलट, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्यातील वैयक्तिक टीका काही प्रसंगी दिसून येते, पण शरद पवार यांच्याविषयी दोघेही सावध भूमिका घेतात.

**अंतर्गत नाराजी आणि शांतता**

शरद पवार गटातील जयंत पाटील आणि रोहित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा अधूनमधून समोर येतात. मात्र, इतर मुद्द्यांवर दोन्ही गटांमध्ये शांतता आहे. एकमेकांवर लक्ष ठेवण्याऐवजी प्रत्येकजण आपापल्या मार्गाने पुढे जात आहे. दोन्ही गटांमध्ये विचारधारा आणि ध्येय एकच आहे. मग फूट किती काळ टिकेल? असा सवाल राजकीय विश्लेषक उपस्थित करतात.

**एकत्र येण्याची शक्यता?**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात आक्रमकता कमी केल्याचे दिसते. शरद पवार यांच्या हयातीत पक्षाला पुन्हा एकत्र आणण्याचा विचार होऊ शकतो, असे काही जाणकारांचे मत आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट सत्तेत आहे, तर शरद पवार यांचा गट विरोधी पक्षात प्रभावी भूमिका बजावत आहे. दोन्ही गटांच्या नेत्यांमध्ये संवादाची काही पातळी कायम आहे.

## बाभळीच्या काट्यांमध्ये सापडला मृतदेह

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १२ :** आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत बोल्डाफाटा शिवारात बाभळीच्या काट्यांमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह शनिवारी आढळून आला. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले

आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत बोल्डा फाटा शिवारात असलेल्या एका प्रवासी निवाऱ्यासमोर मागील काही दिवसांपासून बाभळीचे झाड पडले आहे. त्यानंतर आज सकाळी या बाभळीच्या झाडाच्या काट्यांमध्ये एक मृतदेह असल्याची बाब त्या भागातून वाहतूक करणा?्या नागरीकांना दिसली होती. त्यांनी पाहणी केली असता सदर व्यक्तीचा मृतदेह काट्यांच्या मध्ये असल्यामुळे त्याला ओळखणे कठीण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, उपनिरीक्षक गणेश घोटके, जमादार पंढरी चव्हाण, परमेश्वर सरकटे, प्रविण चव्हाण यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी त्या ठिकाणी पाहणी केली असता मृतदेह बाभळीच्या काट्यांमध्ये अडकलेला दिसून आला. याप्रकरणी तपास सुरू करण्यात आला आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर, ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com